रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २५४
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## म्हाडा वर्षभरात बांधणार १९ हजार ४९७ घरे

**मुंबई :** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) सन २०२५-२०२६च्या अर्थसंकल्पात म्हाडाच्या मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या प्रादेशिक मंडळांमार्फत एकूण १९ हजार ४९७ सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी अर्थसंकल्पात ९२०२.७६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हाडाचा सन २०२४-२५चा सुधारित व सन २०२५-२०२६चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या सन २०२५-२०२६च्या १५९५१.२३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला आणि सन २०२४-२५च्या १०९०१.०७ कोटी रुपयांच्या सुधारित अर्थसंकल्पाला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नुकतीच मंजुरी मिळाली आहे.

अंतरंग

सागरी क्षेत्राचा समग्र विकास आवश्यक : राज्यपाल/२
पारसिक टेकड्यांवरील झाडांची कत्तल; भूस्खलनाची भीती/६
माथेरानमधील कुस्ती स्पर्धेत दिनेश कोकरेची बाजी/८

# ...ती तर मुघल संस्कृती!

## संजय राऊत यांच्या दाव्याचा मुख्यमंत्र्यांकडून समाचार

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीत वडील जिवंत असताना मुलांचा विचार होत नाही आणि करायचाही नसतो. संजय राऊत म्हणतात ती मुघल संस्कृती आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केलेल्या दाव्याचा आपल्या खास शैलीत समाचार घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी गुढीपाड्यानिमित्त नागपुरातील संघ कार्यालयात आले होते. येथे त्यांनी संघाचे संस्थापक तथा पहिले सरसंघचालक डॉ. केशव हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांना आदरांजली अर्पण केली. यानंतर ते संघाच्या कार्यक्रमातही



सहभागी झाले. त्यांच्या या दौऱ्यासंदर्भात खासदार संजय राऊत यांनी मोठा दावा केला. पंतप्रधान मोदींचा वारसदार संघ ठरवेल असे दिसत आहे. संघाची चर्चा बंद दाराआड असते. बंद दाराआड झालेली चर्चा बाहेर येत नाही, पण काही संकेत स्पष्ट असतात. संघ पुढील नेता ठरवेल आणि तो बहुतेक महाराष्ट्रातील असेल, असे राऊत यांनी म्हटले होते.

राऊतांनी नरेंद्र मोदींचा उत्तराधिकारी म्हणून तुमचे नाव घेतल्यासंबंधी विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मोदींचा उत्तराधिकारी शोधण्याचे कोणतेही कारण नाही. ते आमचे नेते आहेत आणि अजून बरीच वर्षे काम करणार आहेत. आम्ही २०२९चे पंतप्रधान म्हणून मोदींकडेच पाहत आहोत.

भारतीय संस्कृतीत वडील जिवंत असताना मुलांचा विचार होत नाही आणि करायचाही नसतो. राऊत म्हणतात ती मुघल संस्कृती आहे. तिथे वडील जिवंत असताना मुले अशा प्रकारचे विचार करतात, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

### 'औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण होऊ देणार नाही'

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी भाषणात मांडलेल्या मुद्द्यांवरही भाष्य केले. राज्य चांगले चालवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्य चालवताना सर्वांना सोबत घेऊन चालवणे हा आमचा प्रयत्न आहे, असे सांगितले. मशिदीवरील भोंग्यांसंदर्भात विचारण्यात आले असता ते म्हणाले, १०० टक्के जे नियमाच्या बाहेर असतील आणि सुप्रीम कोर्टाचा जो आदेश आहे त्या आदेशाचे तंतोतंत पालन महाराष्ट्र सरकार करेल. राज ठाकरेंनी औरंगजेबाच्या कबरीसंदर्भात मांडलेल्या भूमिकेवर ते म्हणाले, ही जी कबर आहे तिला एएसआयचे संरक्षण आहे. आम्हाला औरंगजेब आवडो ना आवडो कायद्याने ५०-६० वर्षांपूर्वी त्या कबरीला संरक्षण दिले आहे. म्हणून त्या ठिकाणी कायद्याचे पालन करणे आमची जबाबदारी आहे, पण कुठल्याही परिस्थितीत औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण होऊ देणार नाही.

# कळंबमधील मयत महिलेचा संतोष देशमुख हत्येशी संबंध नाही

## पोलिसांनी फेटाळला दमानियांचा दावा

**धाराशिव : प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहरात मृतावस्थेत आढळलेल्या महिलेचा मस्साजोग (जि. बीड) सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असे स्पष्ट करीत या संदर्भात सुरू असलेली चर्चा पोलिसांनी फेटाळली आहे.

कळंब शहरात गेल्या चार दिवसांपूर्वी मनीषा बिडवे या महिलेचा घरात मृतदेह आढळून आला होता. ही महिला तेथे एकटीच राहत होती. घराच्या परिसरात दुर्गंधी येत असल्याने शेजारी व पोलिसांनी घराचा दरवाजा उघडला असता या महिलेचा घरात मृतदेह आढळून आला. संबंधित महिला ही सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात चौकशी झालेली महिला असून तिची हत्या झाल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे, पण पोलिसांनी दमानिया यांचा दावा खोडून काढला आहे. आम्ही त्या दिशेनेही तपास केला, मात्र या महिलेचा त्या घटनेशी काहीही संबंध नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे तसेच शवविच्छेदनाचा



अहवाल प्राप्त झाल्यानंतर ही आत्महत्या की हत्या होती हे समोर येईल असे म्हटले आहे.

### 'कराड, घुले यांना मारहाण झाली नाही'

**बीड :** मस्साजोगचे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मिक कराड व सुदर्शन घुले यांना बीडच्या कारागृहात मारहाण झाल्याचे वृत्त कारागृह प्रशासनाने फेटाळले. कारागृहात राजेश वाघमोडे आणि सुधीर सोनवणे यांच्यादरम्यान फोनसाठी वाद झाला होता. हा वाद सुरू असताना काही इतर बंदीही जमले होते, मात्र ही घटना घडत असताना कराड व घुले हे दोघेही तेथे नव्हते. त्यामुळे त्यांना मारहाण झाल्याचे वृत्त चुकीचे असल्याचे कारागृह विशेष महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी म्हटले आहे.



## ईद मुबारक!

**मुरुड : मुस्लिम समाजाचा रमजान ईद सण सोमवारी उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने मुस्लिम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या.**
(छाया : सुधीर नाझरे)

# भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कोण विराजमान होणार?

## काही नेत्यांची नावे चर्चेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याची सध्या प्रचंड चर्चा सुरू आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्यांचा कार्यकाळही संपला आहे. त्यामुळे नवीन अध्यक्ष कोण यासाठी चार नावांची चर्चा होते आहे.



२०१४मध्ये देशात भाजपची सत्ता आल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदी अमित शाह विराजमान झाले होते, तर २०१९मध्ये जे.पी. नड्डा हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. आता त्यांचा कार्यकाळ संपला आहे तसेच त्यांचा नव्या केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे नवा अध्यक्ष निवडणे क्रमप्राप्त आहे.

भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी शिवराजसिंह चौहान, भूपेंद्र यादव, मनोहरलाल खट्टर आणि धर्मेंद्र प्रधान ही चार नावे चर्चेत आहेत. साधारण वर्षभरापूर्वी सचिव विनोद तावडेंचेही नाव चर्चेत होते. आता नवे चेहरे चर्चेत आहेत. ६ एप्रिलला भाजपचा स्थापना दिवस आहे. त्यामुळे या दिवशी नाव जाहीर होण्याची शक्यता आहे. यापैकी कुणाला राष्ट्रीय अध्यक्षपद मिळणार की, भाजप धक्कातंत्राचा वापर करून अनेपक्षित नाव समोर आणणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

## निवडक

### काश्मिरमध्ये रेल्वे पूल, वंदे भारत ट्रेनचे १९ एप्रिलला उद्घाटन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ एप्रिल रोजी काश्मिरमधील उधमपूरला जाणार आहेत. ते चिनाब नदीवर बांधण्यात आलेल्या जगातील सर्वांत उंच रेल्वेपुलाला भेट देतील व त्याचे उद्घाटन करतील. त्यानंतर कटराहून श्रीनगरला जाणाऱ्या वंदे भारत ट्रेनला झेंडा दाखवतील, अशी माहिती केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी दिली. यामुळे काश्मीरसाठी थेट रेल्वे कनेक्टिव्हिटीची दीर्घकालीन मागणी पूर्ण होणार आहे.

### जहाल नक्षलवादी रेणुका उर्फ बानूला कंठस्नान

**दंतेवाडा :** विजापूर-दंतेवाडाच्या सीमेवर सोमवारी (दि. ३१) पोलिसांची नक्षलवाद्यांसोबत जोरदार चकमक झाली. यात कुख्यात महिला नक्षलवादी रेणुका उर्फ बानू ठार झाली आहे. तिच्यावर २५ लाखांचे बक्षीस होते. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून बिजापूर, दंतेवाडा, सुकमा आणि बस्तर या भागांमध्ये चकमकी सुरू आहेत. यामध्ये पोलीस, सुरक्षा जवानांनी नक्षली चळवळीवर मोठा वार केला आहे.

# रायगडात उच्च रक्तदाब व मधुमेह रुग्णांना मोफत औषध पुरवठा




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात उच्च रक्तदाबाचे ३४,०४७, तर २१,३९९ मधुमेह असे एकूण ५५,४४६ उच्च रक्तदाब व मधुमेहाचे रुग्ण आहेत. या रुग्णांची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषद सरसावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या संकल्पनेतून रुग्णांना तीन महिन्यांची औषधे अर्थात एनसीडी कीट उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या उपक्रमाची सुरुवात सोमवारी (दि.३१) करण्यात आली. यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग येथील मुख्य कार्यक्रमात महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत रुग्णांना एनसीडी कीटचे वाटप करण्यात आले.

रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २६ लाख ३४ हजार २०० आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र, २८० उपकेंद्र, सात जिल्हा परिषद दवाखाने, तीन प्राथमिक आरोग्य पथके कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उच्च रक्तदाब, मधुमेह आजारावरील औषधे देण्यात येतात. औषधे संपल्यानंतर दुर्गम भागातील काही रुग्ण सतत आरोग्य केंद्रात येऊन औषधे नेण्यास चालढकलपणा करतात. औषधांअभावी या रुग्णांना इतर आजारांचा सामना करावा लागण्याची शक्यता असते. त्यामुळे जिल्हा परिषद सेस नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह रुग्णांना एका वेळी तीन महिने पुरेल एवढा औषधसाठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाली.



**पनवेल : डायडेम या संस्थेने आयोजित केलेल्या मिस महाराष्ट्र स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची माजी विद्यार्थिनी निव्या नरसिंह नायक हिने उपविजेतेपद पटकाविले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी निव्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते.**

# कुंडलिका खाडीत शिडाच्या होड्यांची शर्यत

## 'हिरकणी' प्रथम



**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही आग्राव येथील दर्यासागर मित्र मंडळाच्या वतीने कुंडलिका समुद्र खाडीत सोमवारी (दि. ३१) आयोजित शिडाच्या होड्यांच्या शर्यतीचा थरार असंख्य रसिक प्रेक्षकांना पहावयास मिळाला. या शर्यतीत आठ होड्यांमधून आग्रावच्या हरिश्चंद्र शेट्टी यांची हिरकणी होडी प्रथम आली.

स्पर्धा ओएनजीसी उरणने प्रायोजित केली होती. आग्राव जेट्टी येथे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी सभापती चित्रा पाटील यांच्या हस्ते निशाण दाखवून दुपारी १२ वाजता शर्यतीस प्रारंभ झाला. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच त्यांनी पुरस्कृत केलेल्या महालक्ष्मी प्रसन्न होडीने स्पर्धेत सहभागसुद्धा घेतला होता. शिवसेना अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोंधळी, ओएनजीसीची अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते संदीप घरत, उमेश मोरे यांच्यासह पंचक्रोशीतील रसिक प्रेक्षकवर्ग, पै-पाहूणे या ठिकाणी उपस्थित होते.

शर्यतीत आग्राव, रेवदंडा, कोर्लई, थेरोंडा, साळाव आदी परिसरातील होड्यांची जणू जत्रा भरली होती. कोर्लईचे संजय पाटील यांची कमलावती होडी तृतीय, तर आग्रावमधील गुरू पाटील यांची हिरावती होडी तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. विजेत्यांना रोख रक्कम व भव्य चषक देऊन गौरविण्यात आले.

शिडावाल्या होड्यांची शर्यत आग्राव दर्यासागर मित्र मंडळ पूर्वपाडाचे अध्यक्ष गोरख डोयले, उपाध्यक्ष दीपक पाटील, सचिव जयवंत बागवाले, खजिनदार राजेंद्र डोयले व पंच कमिटी सदस्य यांच्या परिश्रमाने यशस्वी झाली.

## राज्यात अवकाळी पावसाच्या सरी

**मालेगाव, बीड : प्रतिनिधी**

राज्यात सध्या ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. एकीकडे काही जिल्ह्यांत तापमानाने चाळीशीपार केली आहे, तर दुसरीकडे काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस पडत आहे. मालेगाव परिसरात सोमवारी (दि. ३१) अवकाळी पाऊस झाला आहे, तर बीडच्या पाटोदा तालुक्यातील परिसरात विजांच्या कडकडाटांसह जोरदार पाऊस झाला.

हवामान विभागाने राज्यात पावसाचा इशारा दिला होता. वादळी वाऱ्यासह गारपीटीचीही शक्यता असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार पाऊस पडत आहे, तर काही ठिकाणी वातावरण ढगाळ आहे. दरम्यान, १ एप्रिल रोजी काही जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट; तर काहींना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## शिर्डी विमानतळावरून आता रात्रीही विमानसेवा



**मुंबई : प्रतिनिधी**

शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर रात्रीच्या विमानसेवेला अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली आहे. श्री साईबाबांच्या पहाटे ४ वाजता होणाऱ्या काकड आरतीला उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे.

शिर्डी विमातळावरून दिवसा आठ विमाने येतात व जातात. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने येथे नाईट लँडींगसाठी केंद्राकडे परवानगी मागितली होती. केंद्राच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने २०२३मध्ये याबाबत परवानगी दिल्यानंतर रात्रीच्या विमानाची यशस्वी चाचणी झाली. आता दोन वर्षांने ही सेवा सुरू झाली आहे. या वेळी विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांचे माजी खासदार डॉ. सुजय विखे-पाटील व अधिकाऱ्यांनी स्वागत केले.

शिर्डी विमानतळ प्रशासनाने रात्रीच्या विमानाने येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांच्या स्वागतासाठी आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फुग्यांची सजावट केली होती. हैदराबादवरून इंडिगो एअरलाईनचे विमान ५६ प्रवाशांना घेऊन रात्री साडेनऊ वाजता शिर्डी विमानतळावर उतरले, तर रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी शिर्डी विमानतळावरून हैदराबादकडे ७५ प्रवासी घेऊन विमानाने उड्डाण केले. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शिर्डी विमानतळावरून नाईट लँडींगची गुढी उभारून या विमानतळाने आणखी एक प्रगतीचे पाऊल टाकले आहे.

# सागरी क्षेत्राचा समग्र विकास आवश्यक

## * राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील ९० टक्के व्यापार आजही सागरी मार्गाने होतो. समुद्र मार्गाने होणारा व्यापार हा भारतीय व्यापार तसेच अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी सागरी क्षेत्राचा समग्र विकास होणे अतिशय आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.




सागरी व्यापार क्षेत्रातर्फे साजरा केल्या जाणाऱ्या ६२ वा राष्ट्रीय सागरी दिवसाचे तसेच मर्चंट नेव्ही सप्ताहाचे उद्घाटन राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे झाले त्यावेळी ते बोलत होते. या वेळी नौवहन महासंचालक श्याम जगन्नाथन यांनी राज्यपालांच्या जॅकेटला राष्ट्रीय सागरी दिनाच्या ध्वजाची प्रतिकृती लावली तसेच राज्यपालांना स्मृतिचिन्ह व कॉफी टेबल पुस्तक भेट दिले.

अनेक शतकांपूर्वी भारताचा समुद्री व्यापार क्षेत्रात मोठा दबदबा होता. सम्राट राजेंद्र चोला यांचे नौदल शक्तिशाली होते व आपल्या काळात त्यांनी इंडोनेशिया, कंबोडिया, थायलंड, लाओस, बर्मा आदी देशांपर्यंत व्यापार वाढवला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी नौदलाचे महत्त्व ओळखून सशक्त नौदल उभारले होते, असे राज्यपालांनी सांगितले.

आज व्यापाऱ्यांना कमी वेळात आपला माल गंतव्य ठिकाणी पोहोचवायचा असतो. ग्राहक हा आज राजा आहे. त्यामुळे कंटेनरमध्ये माल ठेवणे व उतरवणे हे वेळेत झाले पाहिजे. या दृष्टीने नौवहन संचालनालय व शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी कंटेनर कॉर्पोरेशन, रेल्वे तसेच व्यापारी संघटनांशी चर्चा करून सागरी व्यापार क्षेत्राचे आधुनिकीकरण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

नौवहन संचालनालयाने व्यापारात अडथळे निर्माण होण्यापूर्वीच समस्यांचे आकलन केले पाहिजे व त्यावर परिणामकारक उपाययोजना केल्या पाहिजे, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

वाढवण बंदर तयार झाल्यानंतर भारताचा जगातील विविध देशांशी व्यापार लक्षणीय वाढणार आहे. त्यामुळे वाढवण बंदर येथे कोणत्या सुविधा असाव्या या दृष्टीने नौवहन क्षेत्राने सिंगापूर, शांघाय, ऍमस्टरडॅम येथील बंदरांचे अध्ययन करावे व त्यानुसार येथे आधुनिक सुविधा निर्माण कराव्या, असे आवाहन राज्यपालांनी या वेळी केले. सागरी प्रदूषण कमी होण्याच्या दृष्टीने हरित सागरी जलवाहतूक वाढवण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावे असेही आवाहन राज्यपालांनी या वेळी केले.

कार्यक्रमाला नौवहन महासंचालनालयाचे मुख्य सर्वेक्षक व अतिरिक्त महासंचालक अजित सुकुमारन, उपमहासंचालक पांडुरंग राऊत, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष कॅप्टन बी के त्यागी, मुख्य जहाज सर्वेक्षक प्रदीप सुधाकर, उपमहासंचालक डॉ सुधीर कोहाकडे, उप नौकानयन सल्लागार कॅप्टन नितीन मुकेश, शिपिंग मास्टर मुकुल दत्ता, कॅप्टन संकल्प शुक्ल, नॅशनल युनिअन ऑफ सीफेअरर्सचे महासचिव मिलिंद कांदळगावकर आदी उपस्थित होते.

# खारापटी येथे होडी स्पर्धा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**



हौशी गणेश आळी मित्र मंडळ यांच्या वतीने गुडी पाडव्याच्या निमित्ताने शिड होडी स्पर्धा कुंडलिक नदीच्या पात्रात आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा कुंभोशी ते खारापटी यादरम्यान दुपारी ११ ते २ वाजताच्या दरम्यान कुंडलिका नदीच्या पात्रात आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत खारापटी, पडम, लक्ष्मीनगर, गोफण, कोपरा, २४ शिड होडी स्पर्धाकानी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा लाकडी होडी व फायबर होडी या दोन प्रकारात घेण्यात आली. या स्पर्धेत फायबर होडीमध्ये प्रथम क्रमांक सुशील नामदेव डोलकर,द्वितीय क्रमांक किरण प्रकाश पोकळे, तृतीय क्रमांक अक्षद कृष्णा डोलकर,चतुर्थ क्रमांक शशिकांत मोरू पोकळे, पाचवा क्रमांक प्रवीण द्वारकानाथ पोकळे यांनी पटकावला असून लाकडी होडी या स्पर्धेत प्रथम क्रमांक विनोद गोपाल दाभाडे, निलेश दशरथ चावरेकर, तृतीय क्रमांक लिलाधर चावरेकर यांनी पटकावला आहे.

या वेळी संतोष रोहीदास नाईक, मच्छिंद्र दुर्गाजी नाईक,मिलनाथ दुर्गाजी नाईक, निमेश सानु नाईक, महेश नरहरी चोरगे, नामदेव हरिश्चंद्र पोकळे, रकिश मधुकर पाटील, कोळी समाज नेते नवनितदादा डोलकर, ग्रामपंचायत सदस्या नयनिता नवनितदादा डोलकर, अपर्णा सुप्रसिध्द डोलकर, सुहास कारभारी, चंद्रकांत कारभारी, गावपाटील केशव चोरगे, रामनाथ पोकळे, विनायक कारभारी, विश्वनाथ नाईक, कृष्णा मुरेकर, विनोद चोरगे, महेंद्र चोरगे, शेखर पाटील, काशिनाथ चोरगे, जयवंत नाईक, परशुराम पोकळे, मळेकर आणि समस्त महीला मंडळ, गणेश आळी मित्र मंडळ खारापटी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



श्री स्वामी समर्थ महाराज जयंती (प्रकट दिन) निमित्त, या वर्षीही निर्गुण स्वामीनाथ प्रतिष्ठानतर्फे सोमवार, ३१ मार्च रोजी निर्गुण स्वामीनाथ मठ–ऐरोली येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय, समर्पण रक्तपेढीतर्फे एक मेगा रक्तदान शिबिर देखील आयोजित करण्यात आले होते.

श्री स्वामी समर्थ महाराज जयंती (प्रकट दिन) असल्याने, दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ऐरोली येथील निर्गुण स्वामीनाथ मठात श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन साजरा करण्यात आला. प्रारभी, सकाळी महाराजांच्या चरणांची पूजा आणि अभिषेक करण्यात आला, त्यानंतर दुपारी महाआरती, होम हवन, आरती, नामस्मरण यासह महापूजा करण्यात आली आणि नंतर रात्री हुक्का आरतीने त्याची सांगता करण्यात आली. या काळात, संपूर्ण रक्तपेढी, घाटकोपर यांनी दुपारी १ ते सायंकाळी ६ या वेळेत एक मेगा रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या काळात शेकडो भाविकांनी रक्तदान केले.

गेल्या १७ वर्षांपासून निर्गुण स्वामीनाथ प्रतिष्ठानकडून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही एक मेगा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे आणि भविष्यातही ही सेवा सुरूच राहील, असे श्री निर्गुण स्वामी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवी अमराळे यांनी सांगितले.

# पोलीस अधीक्षक कार्यालयात कॅन्टीनची सुविधा सुरू



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस कल्याण उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात बांधण्यात आलेल्या एस.पी. कॅन्टीनचे उद्घाटन रविवारी आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर अधिक्षक अभिजित शिवथरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य लेखापाल राहुल कदम, दीपक रानवडे आदी उपस्थित होते.

मानीभुते येथील सखी महिला बचत गटाच्या माध्यमातून हे कॅन्टीन चालविण्यात येणार असून, चहा नाश्त्यासह शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ येथे उपलब्ध होणार आहेत.



**उरण : शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाजमंदिर सेवा संघ येथे स्वामी समर्थांच्या प्रगट दिनानिमित्त दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली होती.**

# महाड पत्रकार संघाचा रत्नागिरी जिल्हा अभ्यास दौरा; विविध स्थळांना भेट

**महाड : प्रतिनिधी**



महाड पत्रकार संघाच्या वार्षिक उपक्रमातील एक उपक्रम असलेला जिल्हा अभ्यास दौरा नुकताच झाला. यावर्षी रत्नागिरी जिल्हा अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध शासकीय कार्यालये आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यात आली.

महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि संघाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, सचिव रोहित पाटील, उदय सावंत यांच्या आयोजनाखाली रत्नागिरी येथे अभ्यास दौरा आयोजित केला होता. २८ ते २९ या दोन दिवसांत अभ्यास दौऱ्यात सहभागी पत्रकारांनी विविध शासकीय कार्यालये आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देत येथील समस्या आणि महत्व जाणून घेतले. रत्नागिरी येथील नारळ संशोधन केंद्रास भेट देताना येथील प्रा. वानखेडे यांनी संपूर्ण नारळ संशोधन विषयक उत्तम माहिती दिली. त्याचप्रमाणे दापोली कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या मत्स्यालयाची देखील माहिती घेतली.

रत्नदुर्ग किल्ला, लोकमान्य टिळक जन्मस्थान, कसबा येथील संभाजी महाराजांना ज्या वाड्यात पकडण्यात आले ते स्थळ, चालुक्य कालीन कर्णेश्वर मंदिर, आदी स्थळांना भेट देण्यात आली. रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. भास्कर जगताप यांचे यावेळी त्यांच्या कार्यालयात पत्रकार संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. जिल्हा रुग्णालयाची माहिती जाणून घेतली.

या अभ्यास दौऱ्यामध्ये ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत सहस्त्रबुद्धे, संघाचे अध्यक्ष निलेश पवार, उपाध्यक्ष महेश शिंदे, सचिव रोहित पाटील, खजिनदार राजेंद्र जैतपाल, उदय सावंत, रघुनाथ भागवत, सुधीर सोनार, किशोर किर्वे, नितेश लोखंडे यांनी सहभाग घेतला होता.

# श्री जोगेश्वरी माता उत्सव कमिटीची बैठक

**नागोठणे : बातमीदार**



नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता उस्तव कार्यक्रमा संदर्भात गुडीपाडव्याच्या दिवशी श्री जोगेश्वरी माता मंदिरात विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन व सचिव भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली.

यात श्री जोगेश्वरी माता उत्सव कमिटी अध्यक्ष व इतर कार्यकारणीची यांची ३ वर्षासाठी निवड करण्यात येत असते. बैठकीत उस्तव कमिटी अध्यक्षपदी मुरावाडी येथील ज्येष्ठ ग्रामस्थ चंद्रकांत ताडकर यांची निवड करण्यात येत असल्याचे विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन यांनी जाहीर केल्यानंतर सर्व ग्रामस्थांनी एकमताने या निवडीला मान्यता दिली.

या बैठकीला श्री जोगेश्वरी माता विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन, सचिव भाईसाहेब टके, देवस्थानचे व्यवस्थापक संजय राजीवले, उस्तव समितीचे मावळते अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, खजिनदार मंगेश कामथे, संजय नांगरे व त्यांची सर्व कमिटी, उस्तव समितीचे माजी अध्यक्ष हरीशशेठ काळे, विलास चौलकर, बाळासाहेब टके, पांडुरंग कामथे, सुनील लाड, खडकआळीचे मार्गदर्शक तात्या खंडागळे, सिद्देश ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळूंखे, सचिन ठोंबरे, संतोष नागोठणेकर, मराठाआळीतील ज्येष्ठ ग्रामस्थ बाळाराम पोटे, दिनेश घाग, देवीचे पुजारी मधुकर पोवळे, अशोक गुरव, विनोद अंबाडे, सुरेश गिजे, किसन भोय, उदंड रावकर, संतोष जोशी, राजेश पिंपळे, हरेश शिर्के, निलेश भोपी, पिंटू रटाटे, शंकर भालेकर, प्रमोद चोगले, गणेश देवळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान उस्तव समितीच्या मागील कमिटीच्या वतीने खजिनदार मंगेश कामथे यांनी हिशोब देऊन उर्वरित रक्कम व सर्व कारभार नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांच्याकडे सुपूर्द केला.

अध्यक्षपदाची निवड झाल्यानंतर गावातील प्रत्येक आळीतील दोन ग्रामस्थांची सभासदासाठी ग्रामस्थांनी एकमताने निवड केली आणि या सभासदा मधून उपाध्यक्षपदी संतोष चितळकर (मराठआळी), सचिवपदी विवेक देशपांडे (प्रभूआळी), खजिनदारपदी जितेंद्र कजबजे (रामनगर), सह सचिवपदी अनिल पवार (शांतीनगर) व सह खजिनदारपदी सतिश पाटील (कोळीवाडा २) यांचीदेखील एकमताने निवड करण्यात आली. सभासद पदासाठी विशाल खंडागळे, संतोष सकपाळ (खडकआळी), पंकज कामथे, अन्विन नाकते (आंगरआळी), रोहिदास हातनोलकर, प्रफुल नागोठणेकर (कुंभारआळी), अनंता चितळकर (मराठआळी), संजय पाटील, संतोष पाटील (गवळआळी), बाबू कोळी, पांडुरंग कोळी (कोळीवाडा), राज पाटील (कोळीवाडा २), हृषीकेश भोय, दिगंबर खराडे (बंगलेआळी), प्रशांत पानकर (रामनगर), हितेश भोय, मच्छिंद्र साळुंखे (जोगेश्वरी नगर), राजेंद्र गुरव (प्रभू आळी), घनश्याम ताडकर (मुरावाडी) आदींची एकमताने निवड करण्यात आली.

# खोपोलीत आज ड्रोनद्वारे सर्वेक्षण

**चौक : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील मिळकतींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण १ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. या सर्वेक्षणावेळी खोपोली नगर परिषद हद्दीतील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भूमी अभिलेख खालापूर व खोपोली नगर परिषद यांच्याकडून करण्यात आले आहे.

भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय भूमी संसाधन विभाग यांचे मार्फत या पथदर्शी प्रकल्पा अंतर्गत खोपोली नगर परिषद यांची कोकण विभागातून निवड झाली आहे. शासनाचे १०० दिवसांचे कृती आराखडा अंतर्गत खोपोली नगर परिषद क्षेत्रातील सर्व मिळकतींचे सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या मार्फत १ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

या वेळी उपसंचालक भूमी अभिलेख कोकण विभाग अनिल माने, जिल्हा भूमी अधीक्षक सुनील इंदलकर, उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत.

नगर परिषद हद्दीतील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन उपअधिक्षक भूमी अभिलेख प्रमोद जरग व खोपोली नगर परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केले आहे.

# श्री स्वामी समर्थ पादुकांची पायी दिंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वासरे खोंड्यातील माणगाव येथील श्री दत्त सेवा मंडळ आणि जय हनुमान ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथून श्री स्वामी समर्थांच्या पादुकांची पायी दिंडी पुण्यनगरी पळसदरी येथे नेण्यात आली. या सोहळ्यात परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माणगाव येथे स्वामी समर्थांच्या पादुकांचे पहाटे पूजन ह. भ. प. शिवाजी महाराज घरत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आरती झाल्यानंतर ही पायी दिंडी ह. भ. प. दत्तात्रेय सखाराम घारे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यनगरी पळसदरीमधील स्वामी समर्थ मठाकडे मार्गस्थ झाली.

ही पायी दिंडी तिवणे, मुळगाव, खांडपे, सांगवी, मोहिली, नेवाळी, आवळस मार्गे पळसदरीकडे निघाली असता या पायी दिंडीचे रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या सह अंकुश दाभणे, रवींद्र दाभणे, दत्तात्रेय देशमुख, अशोक देशमुख, मारुतीबुवा घारे, भालचंद्र वांजळे, रामदास घरत, ॲड. प्रमोद सुर्वे आदींनी स्वागत केले.

या वेळी रवींद्र घारे, संभाजी घारे, जगन्नाथ गुरव, सीताराम घोलप, काशिनाथ मोरे आदी पायी दिंडीमध्ये सहभागी झाले होते. दुपारी १२च्या सुमारास ही पायी दिंडी पुण्यनगरी पळसदरी येथे पोहचली.



# खोपोलीत हिंदू नववर्ष शोभायात्रेचे मुस्लिम बांधवांनी केले स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**



हिंदू नववर्ष व गुढीपाडवा सणाच्या पार्श्वभूमीवर खोपोली विश्व हिंदू परिषद व हिंदू संघटना तर्फे शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या शोभायात्रेत हिंदू बांधवांचे दीपक चौकात मुस्लिम बांधवांकडून स्वागत करण्यात आले. प्रथमता ही घटना खोपोली शहरात ऐतिहासिक घटना समजली जाते, राज्यात विविध ठिकाणी वेगवेगळ्या घटनांमध्ये हिंदू व मुस्लिम बांधवांमध्ये दरी निर्माण होत असल्याच्या बातम्या असताना पार्श्वभूमीवर खोपोली शहरात मुस्लिम बांधवांनी नववर्षा यात्रेचे स्वागत करून नवीन पायंडा पाडला.

सालाबाद प्रमाणे यंदाही विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल, गोरक्ष समिती, व विविध हिंदू संघटना तर्फे खोपोली शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेचे युवा उद्योजक विक्रम साबळे, त्याचबरोबर ज्येष्ठ व्यापारी इंदर्मल शेठ खंडेलवाल, ब्राह्मण सभेचे नरेंद्र हर्डीकर, व इतर मान्यवरांनी श्रीफळ वाढवल्यानंतर शोभायात्रेस प्रारंभ झाला.

महेश्वरी महिला भगिनींनी आपले पारंपारिक नृत्य सादर केले. तर शालू एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतील गतिमंद विद्यार्थ्यांचे लेझीम पथक लक्ष वेधून घेत होते. दीपक चौका जवळ शोभायात्रे आल्यानंतर मशिदीजवळ मुस्लिम बांधवांनी यात्रेतील हिंदू बांधवांना मराठी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. याच वेळी त्यांनी शीतपयाचे वाटप केले.

गेल्या अनेक वर्षातील प्रथमतः मुस्लिम बांधवांकडून हिंदू बांधवांना भेटून शुभेच्छा देण्याचा ऐतिहासिक क्षणाचे उपस्थित सर्व साक्षीदार झाले, या घटनेने खोपोली त सामाजिक सलोखा असल्याचे उदाहरण पहावयास मिळाले.

या शोभायात्रेत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह अविनाश मोरे, राकेश कुमार पाठक, करमरकर, जनकल्याण समितीचे जिल्हा चिटणीस नितीन भावे, विश्व हिंदू परिषदेचे रुपेश मिस्त्री व त्यांचे सहकारी कार्यकर्ते, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसूरकर, डॉ सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, श्रीकांत पुरी, अरुण पुरी, माजी नगरसेविका, प्रिया जाधव, केविना गायकवाड, वैशाली जाधव, अतिक खोत, अबू जळगावकर, गोरक्ष समितीचे कार्यकर्ते विविध सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, अग्निशामक दलापासून निघालेल्या शोभायात्रेचा समारोप वरची खोपोली येथील लोहाना समाज सभागृहात झाला. खोपोली पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पनवेल, उरणमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी





उलवे नोड : भाजप कार्यकर्ते रहिम लदाप यांच्या घरी रमजान ईदनिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत लदाप कुटुंबियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, अशोक कडू, अरमान लदाप आदी उपस्थित होते.

**उरण : वार्ताहर**

रमजान ईदनिमित्त सोमवारी (दि. ३१) उरण पोलीस ठाणे हद्दीतील ५,२०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा करून एकमेकांना सणाच्या शुभेच्छा दिल्या. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

उरण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या जामा मशिद येथे दोन सत्रात मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. सकाळी पहिले सत्र ७.२० ते ७.५५ वाजता सुमारे ५,००० ते ५,५०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. दुसरे सत्र ८.१५ ते ८.३५ या वेळेत



२५०० ते ३००० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. नमाज झाल्यानंतर उरण पोलीस ठाण्याच्या वतीने सर्व मुस्लीम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यांत आल्या.

या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी सर्व मुस्लीम बांधवांना गुलाब पुष्प देवून रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

मदरसा – ए– मेहमुदीया खिडकोळी नाका उरण येथे सकाळी ७ ते ७.३० या वेळेत १२०० ते १२५० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. खॉजा गरीब नवाज सुन्नी हनफी मदरसा बालई रोड उरण येथे सकाळी ७ ते ७.३० या सत्रात ७०० ते ८०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. सकाळी ८ ते ९ वाजता दुसऱ्या सत्रात सुमारे ५०० ते ६०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला.



**पनवेल : रमजान ईदनिमित्त सोमवारी पनवेल शहरातील तक्का परिसरात सामाजिक सलोख्याचे दर्शन पहावयास मिळाले. ईदनिमित्त नमाज झाल्यानंतर हिंदू बांधवांतर्फे मशिदीबाहेर ईदनिमित्त गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, युवा नेते प्रतीक बहिरा, माजी नगरसेवक संदीप बहिरा, आफताब ताडे, युवा मोर्चाचे सदस्य अक्षय भगत, अतुल बहिरा, कुशल बहिरा, रोशन कोळी, गोपीनाथ लोखंडे, संदीप पगडे आदी उपस्थित होते.**

## उभ्या ट्रेलरला दुसऱ्या ट्रेलरची धडक

### एक जण जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उभ्या असलेल्या ट्रेलरला पाठीमागून आलेल्या ट्रेलरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला. हा अपघात कसळखंड गावाच्या आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१ मार्च रोजी पहाटे चारच्या सुमारास झाला.

यातील ट्रेलर (जीजे ०५ सीडब्ल्यू ९७०३) यावरील चालक अभिषेक सिंग (वय २५, युपी रायबेरा) हे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गा वरून पुणे ते बडोदा असे जात होते. किमी ११/२०० या ठिकाणी आले असता त्याने वाहन शोल्डर लेनला थांबून



लघुशंकेसाठी थांबला. या वेळी पाठीमागून येणारा ट्रेलर (एनएल ०१ एल ६९१४) वरील चालक हरपुल नानूराम गुजर (वय ३५, राजस्थान) याला झोपेची डुलकी लागल्याने त्याने समोरील ट्रेलरला पाठीमागून उजव्या साईटला जोरदार धडक देऊन अपघात केला.

या अपघातात चालक हरफुल गुजर याच्या डाव्या पायाला किरकोळ दुखापत झालेली आहे. आयआरबी म्बुलन्सने त्यावर औषधोपचार करण्यात आले. त्यानंतर आयआरबी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला शोल्डर लेनला घेण्यात आलेले असून वाहतूक सुरळीत करण्यात आली. अपघात ठिकाणी महामार्ग पोलीस, पळस्पे मोबाईल वरील स्टाफ, पनवेल तालुका पोलीस व आयआरबी स्टाफ उपस्थित होते.

## रक्तदान शिबिर आणि आरोग्य तपासणी

**पनवेल :** श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल–नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना, आम्ही रक्तदाते पनवेलचे आयोजित रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणीचे आयोजन रविवार ६ एप्रिल सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत करण्यात आले आहे. श्री पूज्यसिंधी पंचायत झुलेलाल मंदिर विश्राळी नाका, पनवेल येथे हे शिबिर होणार असून अवयव दान या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या वेळी प्रत्येक रक्तदात्याला टोकन ऑफ लव देण्यात येईल आणि सेल्फी पॉईंट तसेच ईसीजी, रक्त शर्करा तपासणी केली जाईल. या शिबिरात येण्याचे आवाहन अध्यक्ष ॲड. मनोहर सचदेव यांनी केले आहे.

## पनवेलमध्ये महिला उद्योजिकांचे विविध व्यवसाय प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिणीता सोशल फाऊंडेशनच्या महिला उद्योजिकांचे ४४वे विविध व्यवसायांचे प्रदर्शन कल्पतरू सोसायटी पनवेल येथे झाले. गेल्या चार वर्षांपासून सातत्याने परिणीता परिवाराकडून महिला उद्योजिकांच्या व्यवसायांचे प्रदर्शन आयोजित केली जाते. या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा शनिवारी (दि.३०) सायंकाळी ४ वा. पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीनाथ कंस्ट्रक्शनच्या प्रेरणा गायकवाड, सोशल मीडिया ओबीसी मोर्चा जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, परिणीता फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष साक्षी सागवेकर आदी मान्यवर



उपस्थित होते.

प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी कल्पतरू सोसायटीचे चेअरमन प्रशांत ठाकूर आणि रहिवाशांचे मोलाचे सहकार्य लाभले. गुडीपाडव्याच्या पूर्वसंध्येला आयोजित या प्रदर्शनात परिणीता सोशल फाऊंडेशनच्या एकूण ३० उद्योजिका सदस्या सहभागी झाल्या होत्या. यात उद्योजिका अवनी निशार, उमा प्रभूदेसाई, पल्लवी नागवेकर, योगिता कलांगे, पूजा साखरे, विद्या कदम, मीना, शिफा लाला, मनूजा माघवी, मिताली दळवी, स्वरा ढवळे, पूनम निकम, श्रद्धा पाटील, रुपाली पाटील, लावण्या दुर्गम, हर्षदा पाटील, आशा घोडके, प्रियंका केळकर, मोडक काकी, ज्योत्स्ना कदम, शहा काकी, प्रज्ञा परब, भावना मोटर्स, यासह उद्योजिकांनी सहभाग घेतला. कल्पतरू सोसायटीतील असंख्य रहिवाश्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. या सर्व रहिवाशांचे परिणीता सोशल फाऊंडेशनकडून आभार व्यक्त करण्यात आले.



**उरण : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधीकरणाचे अध्यक्ष तथा वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ यांना वाढदिवसानिमित्त भारतीय बंदर आणि गोदी महासंघाचे महामंत्री व जेएनपीटी जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष सुरेश पाटील, अनिल चिर्लेकर यांनी शुभेच्छा दिल्या.**

## फुंडे हायस्कूल येथे रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांचा स्मृतिदिन

**उरण : वार्ताहर**

रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा स्मृतिदिन शनिवारी तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे, उरण येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस. एस. पाटील, साधना पाटील, एच.एन. पाटील आणि सर्व सेवक वृंद यांच्या हस्ते कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन



करण्यात आले. यानंतर कुमारी कांचन घुगे, अथर्व कोळी या विद्यार्थ्यांनी लक्ष्मी वहिनी यांच्या विषयी आपल्या भाषणातून माहिती सांगितली.

आर.जी. शेळके, बाबर मॅडम तसेच प्राचार्य एम.जी.म्हात्रे यांनीदेखील लक्ष्मी वहिनींच्या त्यागाची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यातून बोध घेऊन पुढे शिक्षण घेत राहावे यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी स्नेह भोजनाची संपूर्ण व्यवस्था प्राचार्य सरांच्या मार्गदर्शनाखाली पोषण आहार विभाग प्रमुख सुहास नाईक यांनी केली होती.



**पनवेल : तालुक्यातील देवद येथे श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा श्री स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, जय हनुमान युवा मित्र मंडळ, गावदेवी युवा मित्र मंडळ, धैर्य ग्रामसंघ महिला मंडळ, गावदेवी महिला मंडळ व ग्रामस्थ मंडळ, देवद यांनी आयोजित केला होता. यानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

## कळंबोलीत नववर्ष शोभायात्रा

**कळंबोली : बातमीदार**

हिंदू नववर्षाच्या स्वागता निमित्त कळंबोली मध्ये गुढीपाडवा सांस्कृतिक व सामाजिक सेवा संस्था कळंबोली यांच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आलेले होते. शिवगर्जना ढोल पथक, लाठी काठी खेळ, लेझीम पथक आणि पारंपारिक वेशात कळंबोली परिसरातील नागरिकांनी सहभाग घेऊन शोभायात्रा उत्साहात पार पाडली.

कळंबोलीतील गुढीपाडवा सांस्कृतिक व सामाजिक सेवा संस्था गेल्या १८ वर्षापासून गुढीपाडव्यानिमित्त नववर्ष स्वागत शोभायात्रेचे आयोजन करत आली आहे. पाडव्यानिमित्त नववर्षाचे स्वागत शोभा यात्रे मध्ये महिला पुरुष बच्चे कंपनीने भगवे फेटे परिधान केल्याने शोभायात्रेचा स्वरूप हे सर्व भगवामय झाल्याचे दिसून आले. शोभायात्रेमध्ये छत्रपती शिवरायांचा चलचित्र असलेला घोड्यावरील पुतळा तसेच राम लक्ष्मण सीता यांचे चलचित्रामधील पुतळे सर्वांचेच आकर्षक बनले. शोभायात्रा वसाहतीमधील प्रमुख रस्त्यावरून मार्गस्थ होऊन पुन्हा माता मंदिराजवळ त्याची सांगता करण्यात आली.

या शोभायात्रेचे आमदार विक्रांत पाटील तसेच कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, प्रिया मुकादम, भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, रमेश राव, उद्योजक गोरक्ष गायकवाड, मोनिका महानवर तसेच अन्यही मान्यवरांचा समावेश होता कळंबोलीतील विविध संस्था या शोभायात्रेत सहभागी झाल्या होत्या.

कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली दोन अधिकारी व पंधरा पोलीस कर्मचारी सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले होते.



## गोपीनाथ पाटील यांचा सत्कार

**पनवेल** : आरोग्य विभाग तालुका खालापूरचे आरोग्य कर्मचारी गोपीनाथ पाटील यांचा जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पनवेल तालुक्यातील नेरे येथील गोपीनाथ पाटील हे आरोग्य कर्मचारी म्हणून खालापूर येथे कार्यरत आहेत. त्यांनी टीबी मुक्त ग्रामपंचायत या कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी करत सक्रिय सहभाग घेतला आणि त्यावर गाणे सादर करून क्षयरोग या आजारावर जनजागृती करण्याचे काम केले. त्यासाठी गोपीनाथ पाटील यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बाष्टेवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## द्रोणागिरीमध्ये गोशाळेचे उद्घाटन

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या जनावरांना कुठेतरी आसरा मिळावा, गाय वासरू आदी जनावरांचे उन पाऊस, हिवाळा वादळवारा पासून संरक्षण व्हावे, अन्न पाण्यावाचून त्यांचे मृत्यू होऊ नये या दृष्टीकोणातून संस्कृतीचे संवर्धन, संरक्षण करत सामाजिक बांधिलकी जपत शिव संस्कृती गोवर्धन व पर्यावरण सामाजिक संस्थेच्या वतीने गुढीपाडवा या हिंदू धर्मातील पवित्र सणाच्या शुभ मुहूर्तावर उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमधील सेक्टर ५१, ए स्मशान भूमीजवळ येथे गोशाळेचे सर्व संचालकांच्या उपस्थितीत उदघाटन करण्यात आले.

सकाळी ७ वाजता प्रसिद्ध उद्योजक तथा संस्थेचे उपाध्यक्ष कैलास म्हात्रे व भावना म्हात्रे यांच्या हस्ते गोठ्याचे पूजन झाले. तदनंतर संस्थेचे अध्यक्ष जगजीवन भोईर, सुरेखा भोईर यांनी गुढी उभारून गुढीचे व गोठ्यातील गाय वासरूचे पूजन केले. या वेळी शिव संस्कृती गोवर्धन व पर्यावरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जगजीवन भोईर, उपाध्यक्ष कैलास म्हात्रे, सेक्रेटरी प्रदीप नाखवा, खजिनदार नितीन



ठाकूर, संचालक दिपक ठाकूर, जीवन म्हात्रे, समीज पाटील, विठ्ठल ममताबादे, प्रतीक पाटील, सामाजिक कार्यकर्ते – सोमनाथ भोईर, भारत काटे, दिपक पाटील, शिवकुमार मढवी, सुरेखा भोईर, भावना म्हात्रे, भावना भोईर, स्वप्नील कवळे, अजयराजे भोसले, अनिरुद्ध महेश म्हात्रे, गोसेवक काशिनाथ वाघमारे आदी उपस्थित होते.

विविध भागातील गाई गुरे वासरांचे मृत्यूचे वाढते प्रमाण व गाई गुरे यांची दिवसेंदिवस घटनारी संख्या लक्षात घेता निसर्गाचे, पर्यावरणाचे, पशु पक्ष्यांचे संवर्धन संरक्षणाचे कार्य करणाऱ्या शिव संस्कृती गोवर्धन व पर्यावरण सामाजिक संस्थेचे हे पहिलेच उपक्रम असून या उपक्रमाला सर्वच स्तरातून जनतेचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

संस्थेचे अध्यक्ष जगजीवन भोईर यांच्या संकल्पनेतून व सर्व संचालक, संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमातून द्रोणागिरी नोड परिसरात पहिल्या गोवर्धन गोठ्याचे /गोशाळेचे उद्घाटन झाले.

## संपादकीय

# भविष्यातही मार्गदर्शक

गुढीपाडव्याच्या दिवशी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेशीमबाग येथील स्मृतीमंदिराला भेट दिली. शंभर वर्षांपूर्वी डॉ. हेडगेवार यांनी बीजारोपण केलेल्या राष्ट्रीय विचारांचा 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'च्या रूपाने आज वटवृक्ष झाला आहे. शंभर वर्षांच्या संघाच्या यात्रेनंतर निश्चितच देश आज वेगळ्या वळणावर आहे. भविष्यातही संघाच्या कार्यातून भारतीय समाजात सकारात्मक परिवर्तन घडत राहील.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारताच्या अमर संस्कृतीचा अक्षयवट आहे. देश इतकी वर्षे मानसिक गुलामगिरीत होता. आता मात्र तो यातून बाहेर पडत आहे. आम्हाला देशासाठी जगायचे आहे ही भावना युवा पिढीमध्ये आहे. डॉ. हेडगेवार व गुरुजींच्या प्रेरणेनेच विकसित भारताचा संकल्प पूर्ण होईल असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी रेशीमबाग येथील स्मृतीमंदिराला भेट दिल्यानंतर काढले. आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृतीस्थळाला अभिवादन केल्यानंतर पंतप्रधान मोदी बोलत होते. स्मृतीमंदिरात येऊन मी भारावून गेलो आहे. संघाच्या या दोन महान स्तंभांची आठवण देणारी ही जागा देशसेवेसाठी समर्पित लाखो स्वयंसेवकांसाठी ऊर्जा केंद्र आहे असा अभिप्रायही मोदींनी भेटीनंतर लिहिला. नागपूर येथे आगमन झाल्यानंतर पंतप्रधानांचा ताफा थेट रेशीमबागेकडे गेला. २०१४ मध्ये पंतप्रधान बनण्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी या स्मृतीमंदिराला भेट दिली होती. त्यानंतर पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात मोदींनी स्मृतीमंदिराला भेट दिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळेच या भेटीला विशेष महत्त्व आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही बिगर राजकीय संघटना आहे. परंतु भारतीय जनता पक्षातील बहुतेक नेते या संघटनेच्या मुशीतूनच तावून सुलाखून निघालेले असतात. संघाचे विचार, शिस्तबद्ध कार्यपद्धती यांचा मोठा लाभ भाजपच्या कार्यकर्त्यांना होत आला आहे. कार्यकर्ता विकास वर्गातूनच असे शिस्तबध्द कार्यकर्ते तयार होतात. संघ ही केवळ स्वयंसेवी संघटना नसून समाजाच्या विविध स्तरांमध्ये काम करणारे हे एक व्यापक आंदोलन आहे. सीमाभाग, जंगले आणि डोंगराळ भागातही संघाचे स्वयंसेवक काम करतात. शिक्षण, सेवा, ग्रामीण विकास, आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्रीय सुरक्षा अशा विविध क्षेत्रांमध्ये संघाने योगदान दिले आहे. या गौरवशाली प्रवासाला आता शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. शेकडो वर्षे परकियांच्या क्रूर आक्रमणांनी आणि गुलामीने आपल्या देशातील सामाजिक संस्कृती व रचना पुसण्याचा प्रयत्न केला. परंतु भारताची सामाजिक जाणीव कुणीही संपवू शकले नाही. या कठीण काळातही भारतीयत्वाची जाणीव जागृत ठेवणाऱ्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या. शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीय जाणिवेच्या संवर्धन व संरक्षणासाठी ज्या विचारांचे रोपटे लावले गेले ते महान वटवृक्ष म्हणून आज उभे आहे. कोट्यवधी स्वयंसेवक याच्या फांद्या आहेत. संघ आज देशभरातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही कार्यरत आहे. संघाच्या परिश्रमातून विकसित भारताचा नवा इतिहास लिहिला जात आहे. १९२५ ते १९४७ हा संघर्षाचा काळ होता. स्वातंत्र्य हे लक्ष्य देशासमोर होते. आज संघाच्या शंभर वर्षांच्या यात्रेनंतर देश वेगळ्या वळणावर आहे. २०२५ ते २०४७ या कालखंडात मोठे लक्ष्य आमच्यासमोर आहे. डॉ. हेडगेवार आणि गुरुजींचे मार्गदर्शन आम्हाला कायम ऊर्जा देत राहील असे पंतप्रधान मोदींनी रविवारी म्हटले. संघाची भविष्यातील भूमिकाच यातून अधोरेखित होते.**

# कर्जतमध्ये सर्वधर्मसमभावाची परंपरा...








**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत तालुक्यात सर्व जाती धर्माचे, अठरा पगड जातींचे लोक गुण्यागोविंदाने राहात आहेत. इतकेच नव्हे तर सर्व धार्मियांच्या सणांसाठी अन्य समाजाचे लोकही आवर्जून हजेरी रावत असतात. त्यामुळे इतक्या वर्षात कर्जत तालुक्यात कधीही जातीविषयीची तेढ निर्माण झाली नाही आणि भविष्यातही होणार नाही. याचे कारण सर्वच जण मिळून मिसळून राहात आहेत. त्यामुळे कर्जतमध्ये सर्वधर्मसमभाव ही परंपरा कित्येक वर्ष सुरू आहे. याला एकदाही साधे गालबोटही लागले नाही.

कर्जत तालुक्यात मराठा समाजाचे प्राबल्य आहे. त्या खालोखल आगरी समाज, आदिवासी समाज, दलित समाज त्यानंतर मुस्लिम समाज असे वर्गीकरण आहे. बारा बलुतेदारांची संख्याही प्रत्येक गावात आहे. तालुक्यात मराठा समाजाबरोबरच आगरी समाजाची गावेच्या गावे आहेत. मुस्लिम समाजाचीही मोठ मोठी गावे आहेत. प्रत्येक गावाजवळ बौद्ध वस्ती आहे. आदिवासीवाड्या आहेत. ब्राह्मण समाजही बऱ्यापैकी आहे. जैन, गुजराथी, उत्तर प्रदेशीय, बोहरा व ख्रिश्चन समाजही शहरी भागात आहे, मात्र कधीही सामाजिक तेढ निर्माण झाली नाही. काही तरुणांनी समाज सोडून विवाह केले आहेत. सुरुवातीला थोडा तणाव असायचा, परंतु एखादे अपत्य झाले की सारे काही विसरून सर्व धर्मसमभाव जागा होतो आणि सर्रासपणे रोटीबरोबरच बेटीचा व्यवहारसुद्धा होऊ लागला आहे. ब्राह्मण समाजाची मुलगी मुस्लिम समाजाचा मुलगा, ब्राह्मण समाजाचा मुलगा आणि मुस्लिम समाजाची मुलगी, ब्राह्मण समाजाचा किंवा मराठा समाजाचा मुलगा आणि जैन समाजाची मुलगी, मराठा किंवा आगरी समाजाचा मुलगा आणि मुस्लिम समाजाची मुलगी, मराठा समाजाचा मुलगा आणि बोहरा समाजाची मुलगी, मराठा समाजाचा मुलगा व ख्रिश्चन समाजाची मुलगी, मराठा समाजाचा मुलगा आणि उत्तर भारतीय मुलगी, दलित समाजाचा मुलगा व जैन समाजाची मुलगी, मराठा समाजाचा मुलगा आणि दलित समाजाची मुलगी इतकेच काय तर काही मराठा व आगरी समाजाच्या मुलांनी आदिवासी समाजाच्या देखण्या मुलींशीसुद्धा विवाह केले आहेत. अर्थात हे सारे प्रेमविवाह आहेत आणि सारे जण अगदी गुण्यागोविंदाने संसार करीत आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यात भविष्यात कोण कुणाचा सोयरा होईल? हे सांगता येत नाही.

विशेष म्हणजे सर्व समाज गुण्यागोविंदाने नांदत आहेत. तोरण दारी व मरण दारी एकमेकांची उपस्थिती असते. गणेशोत्सवात विसर्जन मिरवणूक मस्जिदी वरून जात असताना मुस्लिम बांधव कर्जत व नेरळ येथील मस्जिदीतून श्री गणेशमूर्तीवर पुष्पवृष्टी करतात. ही परंपरा कित्येक वर्ष सुरू आहे. दुसरीकडे रमजान महिन्यात अनेक राजकीय पक्षांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते आणि रमजान ईदीच्या दिवशी मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देण्यासाठी अनेक हिंदू बांधव मशीदीसमोर येऊन आलिंगन देताना दिसतात. कर्जतच्या पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे या महिला अधिकाऱ्यांनीसुद्धा इफ्तार पार्टी देऊन सर्वधर्मसमभावाची परंपरा जपली होती. ही परंपरा अखंडीतपणे सुरू आहे. याला अपवाद कोविड काळात होता. कर्जतमधील खाटीक आळीतील साई मित्र मंडळाचा अध्यक्ष म्हणून नजीम खान हा मुस्लिम युवक अनेक वर्ष काम करीत आहे, मात्र त्याने कधीही कोणत्याही प्रकारचा दुजाभाव केला नाही. उलट माघी गणेशोत्सव कसा चांगला होईल याकडे त्याचे पाच दिवस बारीक लक्ष असते. याचे बहुतांश कर्जतकर साक्षीदार आहेत.

भिसेगाव परिसरात एक मुस्लिम कुटुंब त्यांच्या निवास्थानी श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करीत असे असेही ऐकीवात आहे. अनेक मुस्लिम बांधव रक्षाबंधन व भाऊबीजेला मानलेल्या हिंदू भगिनीच्या घरी जात असतात. अशी अनेक उदाहरणे आहेत.

प्रत्येक राजकीय पक्षामध्ये अल्पसंख्याक सेल आहे. त्यामुळे सामाजिक कार्य करताना आपसूकच सर्वजण एका व्यासपीठावर येऊन ते कार्य तडीस नेतात. अशी अनेक उदाहरणे आहेत. कर्जत नगर परिषदेच्या पहिल्याच निवडणुकीनंतर बोहरा समाजाच्या झूलकरनैन डाभिया या कार्यकर्त्याला स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली होती तर त्यानंतरच्या झालेल्या निवडणुकीनंतर स्वीकृत नगरसेवक म्हणून लालधारी पाल या उत्तर भारतीय युवकाला सामावून घेतले होते. काही हिंदू विवाहांमध्ये मुस्लिम बांधव अगदी घरच्या नातेवाईकांसारखे वावरताना दिसतात. इतकेच नव्हे तर पडेल ते काम करून शुभकार्य निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी हातभार लावत असतात.

कर्जतमध्ये कधीही जातीय दंगल झाली नाही. समाजात साधी धुसफूससुद्धा झाली नाही. काही वर्षांपूर्वी भिवंडीची दंगल झाली होती, मात्र कर्जतमधील मुस्लिम बांधवांना त्याची झळही लागली नाही. उलट त्यांना धीर देण्याचेच काम त्या वेळी कर्जतकरांनी केले होते. इतका एकोपा कर्जत तालुक्यात सर्वच समाजामध्ये आहे. प्रत्येक वेळी रमजान ईदबरोबर कधी गुढीपाडवा, कधी गणेशोत्सव तर कधी दसरा सण येत असतो. त्यानिमित्ताने कर्जत पोलीस ठाण्यात शांतता समितीची सभा असते. त्या वेळी सर्व धर्माचे बांधव मांडीला मांडी लावून बसतात व आमच्यात कधीच तेढ निर्माण होणार नाही. अशी पोलिसांना ग्वाही देता असतात. योगायोग म्हणजे गुढीपाडव्याबरोबरच बोहरा समाजाची रमजान ईद एकाच दिवशी आली होती. या सर्वधर्म समभावाच्या परंपरेला भविष्यात कधीही दृष्ट न लागो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!



## बदलते तंत्रज्ञान

# तुमच्या फोनमधील इंटरनेट स्पीड असा वाढवा

अनेकांच्या मोबाईलवर इंटरनेटचे स्पीड पाहिजे तेवढे मिळत नाही. आता स्पीड कमी पडत आहे म्हणून टेन्शन घेऊ नका. अशा काही टिप्स आहेत ज्यामुळे तुमच्या मोबाईलवरील इंटरनेटचे स्पीड वाढणार आहे. खराब इंटरनेट स्पीडमुळे, आपला अनुभव खूप वाईट होतो.



स्लो इंटरनेटमुळे व्हिडीओ स्ट्रीमिंग, सोशल मीडिया ब्राउझिंग आणि गेमिंग सारख्या तुमच्या ऑनलाइन ॲक्टिव्हिटीमध्ये व्यत्यय येऊ शकतो, पण काही सोप्या टिप्स वापरून तुम्ही तुमचा इंटरनेट स्पीड पूर्वीपेक्षा जास्त वाढवू शकता.

अनेक वेळा फोनच्या नेटवर्क सेटिंग्जमध्ये समस्या येते, यामुळे इंटरनेटचा स्पीड कमी होतो. यावेळी तुम्ही फोनची नेटवर्क सेटिंग्ज रीसेट करून ते दुरुस्त करू शकता. यासाठी पहिल्यांदा Settings System Advanced Reset options Reset Wi-Fi, मोबाइल आणि ब्लूटूथवर जा आणि नंतर कन्फर्मवर क्लिक करून ते रीसेट करा.

या टीप्स फॉलो केल्यानंतर, तुम्हाला इंटरनेट स्पीडमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसून येईल.


जर तुमच्याकडे ड्युअल सिम डिव्हाइस असेल, तर स्पीड इंटरनेटसाठी तुम्ही योग्य सिम डेटा सिम म्हणून सेट केला आहे का ते तपासा. तसेच, फोन सेटिंग्जमध्ये जा आणि LTE/४G/५G मोड चालू करा जेणेकरून तुम्हाला जलद नेटवर्क मिळेल.

एवढेच नाही तर, तुम्ही फक्त ५G मोड निवडून आणखी चांगल्या गतीचा आनंद घेऊ शकता. या फिचरचा एक तोटा आहे; जर तुम्ही अशा ठिकाणी असाल जिथे ५G रेंज नाही, तर नेटवर्क पूर्णपणे गायब होईल.

ज्या भागात ५G कव्हरेज स्थिर आणि मजबूत आहे तेथे फक्त ५G मोड वापरणे चांगले. जर तुम्ही अशा ठिकाणी असाल जिथे ५G नेटवर्क नाही, तर ऑटोमॅटिक नेटवर्क मोड सेट करणे चांगले होईल जेणेकरून तुमचे डिव्हाइस गरजेनुसार ४G किंवा ३G नेटवर्कवर शिफ्ट होऊ शकेल.

अनेक जण नवीन मोबाईल खरेदी केल्यानंतर तो वेळेवर अपडेट करत नाहीत. काही लोक चार महिने फोन अपडेट न करता वापरतात, यामुळे फोनमधील समस्या वाढू लागतात. म्हणून वेळोवेळी तुमचा फोन अपडेट करत रहा.

# 'आरएसएस'चे संस्थापक डॉ. केशव हेडगेवार



**निमित्त**

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९मध्ये एका गरीब ब्राम्हण कुटुंबात झाला. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक राहिले आहेत. त्यांनी लावलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.

हेडगेवार लहानपणापासूनच क्रांतीकारी विचाराचे होते. त्यांच्या लहानपणीची एक गोष्ट अशी की, ते जेव्हा शाळेत शिकत होते, तेव्हा त्या शाळेची तपासणी करण्यासाठी एक इंग्रजी अधिकारी आला होता. हेडगेवार यांनी त्या वयात त्या अधिकाऱ्याच्या शाळा तपासणीला विरोध केला तसेच आपल्या काही मित्रांना एकत्र करत अधिकाऱ्याविरोधात भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. हेडगेवारांचे शिक्षण त्यांच्या मोठ्या भावाने केले. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर, १९१० साली ते वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी कोलकत्त्याला गेले. तरुणपणात त्यांनी सशस्त्र क्रांतीत सहभाग घेतला होता. शाळेत असताना त्यांनी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वाटण्यात आलेली मिठाई रागाने फेकून दिली होती तसेच पुढे 'वंदे मातरम'चा घोष केल्याबद्दल त्यांना शाळेतून काढूनदेखील टाकण्यात आले होते.

बंगालमधील प्रत्यक्ष क्रांतिकार्यात सहभाग घेता यावा यासाठी त्यांनी आपले उच्चशिक्षण जाणीवपूर्वक कोलकातामध्ये पूर्ण केले. तेथे ते अनुशीलन समिती या क्रांतिकारी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते बनले. पुढे त्यांनी १९२५ साली दसरा अर्थात विजयादशमीच्या दिवशी संघाच्या पहिल्या शाखेची स्थापना केली. डॉक्टरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक वेगळे तत्त्वज्ञान व वेगळ्या प्रकारची कार्यपद्धती दिली. त्या पायावरच रा. स्व. संघ हा गेली अनेक वर्षे यशस्वीरीत्या कार्यरत आहे. क्रांतिकार्यातील आपले जुने सहकारी सोबत घेऊन त्यांनी नागपुरात एका पडक्या वाड्यात संघाची पहिली शाखा सुरू केली. चारित्र्यसंपन्न व्यक्तिनिर्माण व त्या आधारावर राष्ट्रनिर्माण या अंतिम ध्येयाचा विचार त्यांनी संघस्थापनेच्या माध्यमातून केला. डॉ. हेडगेवार हे कुशल संघटक, मार्गदर्शक व नेते होते. त्यांच्याच प्रेरणादायी नेतृत्वामुळे गोळवलकर गुरूजी, बाळासाहेब देवरस, भैय्याजी दाणी, एकनाथ रानडे, पं. दीनदयाळ उपाध्याय यासारखे नेते, कार्यकर्ते देशाला मिळाले. १९२५ म्हणजेच संघाच्या स्थापनेपासून ते १९४० त्यांच्या मृत्यूपर्यंत असे पंधरा वर्ष डॉक्टर हेडगेवार सतत देशभर भ्रमण करत होते. त्यांनी संघाच्या माध्यमातून एक-एक माणूस जोडण्याचे कार्य केले. त्यांच्या कष्टाचे फळ म्हणजे आज संघाचा महाकाय वटवृक्ष झाला आहे. लाखो कार्यकर्ते आज संघासाठी काम करत आहे.

सच्चे नेतृत्व, त्याग, सेवा, समर्पण भावना, दूरदर्शी विचार आणि शिस्तबद्ध, निश्चल व व्रतस्थ कार्यजीवनशैली ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे होती. २१ जून १९४० रोजी डॉक्टरांचे निधन झाले. त्यापूर्वी एक वर्ष आधी त्यांनी संघाच्या कार्यपद्धतीबाबत संघस्वयंसेवकांसाठी काही निर्देश देऊन ठेवले. संघाची निश्चित अशी कार्यपद्धती तयार झाली. आपल्या पश्चात संघटनेला ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असलेली शिदोरीच जणू त्यांनी संघाला अर्पण केली.

**हेडगेवारांवरील मराठी पुस्तके**

गोष्टीरूप हेडगेवार, मला उमगलेले डॉक्टर हेडगेवार, युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार, डॉ. हेडगेवार. (साभार : इंटरनेट)

**बातमीतील बात**




## आरोग्य प्रहर

# रात्री झोपण्यापूर्वी कधीही वापरू नका फोन; मोठा धोका

रात्री झोपण्यापूर्वी जर तुम्ही फोन पाहत असाल तर ही सवय लवकर बदला. दोन वर्षे चाललेल्या एका रिसर्चमधून असं दिसून आलं आहे की, झोपण्यापूर्वी फोन पाहणं खूप नुकसान करू शकतं. सर्व वयोगटातील लोकांना याचा त्रास होत असल्याचं समोर आलं आहे. रात्री झोपण्यापूर्वी फोन वापरल्याने होणारं नुकसान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच सहन करावं लागतं. झोपण्यापूर्वी फोन पाहण्याचे काय तोटे आहेत ते जाणून घेऊया...



JAMA जर्नलमध्ये एक रिसर्च प्रकाशित झाला आहे. जवळपास दोन वर्षे चाललेल्या या रिसर्चमध्ये १.२२ लाख लोकांनी भाग घेतला. रिसर्चमध्ये झोपण्यापूर्वी लोकांच्या फोन वापराच्या पद्धतीचं निरीक्षण करण्यात आलं. यामध्ये असं दिसून आलं आहे की, जे लोक झोपण्यापूर्वी फोन पाहतात त्यांची झोपेची गुणवत्ता इतरांपेक्षा ३३ टक्के कमी असते. याचा अर्थ असा की फोनकडे पाहिल्याने झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

झोपण्यापूर्वी फोन आणि इतर स्क्रीन डिव्हाइसेसकडे पाहण्याचा परिणाम सर्व वयोगटातील लोकांवर होतो, असंही रिसर्चमधून समोर आलं आहे. झोपण्यापूर्वी फोन पाहणं आणि त्याचा झोपेवर होणारा परिणाम यावर हा आतापर्यंतचा सर्वात मोठा रिसर्स आहे. यामध्ये फक्त झोपेच्या वेळेवर होणारा परिणाम पाहण्यात आला नाही तर झोपेच्या गुणवत्तेवर होणारा परिणामदेखील तपासण्यात आला आहे.

रिसर्चमध्ये असं आढळून आलं की, फोनकडे पाहण्याचा परिणाम आठवड्याच्या शेवटच्या दिवसांपेक्षा आठवड्याच्या दिवसात झोपेच्या सरासरी वेळेवर जास्त होतो. याचा अर्थ असा की कमी झोपेचा तुमच्या कामावर परिणाम होईल आणि तुमची प्रोडक्टिव्हिटी कमी होऊ शकते. फोनकडे पाहिल्यामुळे लोक दर आठवड्याला सरासरी ५० मिनिटं कमी झोपत आहेत.

दरम्यान, अनेक जण रात्री झोपताना लाईट बारीक करून मोबाईल पहात असतात. याचा थेट परिणाम दृष्टीवर अर्थात डोळ्यांवर होतो. कमी प्रकाशात किंवा अंधारात मोबाईल पाहिल्याने डोळ्यांची क्षमता कमी होते. अनेकदा डोळे चुरचुरतात, त्यांच्यावर ताण पडतो आणि कालांतराने दिसण्यावरही परिणाम होतो.

# रायगडात रमजान ईद उत्साहात साजरी



**माणगाव : प्रतिनिधी**

रमजान ईद माणगाव तालुक्यात सोमवारी सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. या ईदनिमित्त मुस्लिम बांधवानी ईदची मशिदीमध्ये सामुदायिक नमाज (प्रार्थना) अदा केल्यावर गळाभेट आलिंगन देत एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा हर्षदा काळे, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, माजी सभापती संगीता बक्कम, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, भाजपच्या संयोजिका शर्मिला सत्वे, माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण, माजी उपगराध्यक्ष राजेश मेहता आदींनी मुस्लिम बांधवांची भेट घेत त्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पत्रकार बांधव यांच्यासह अनेक हिंदू बांधवानी दूरध्वनी व मोबाईलवरून संदेश पाठवून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

माणगाव तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, नाणोरे, लोणशी, मोर्बा, साई, निजामपूर, दहिवलीकोंड, दहिवली, तारणा, वडवली, मांजरवणे, नांदवी, पुरार, वणी, मलई कोंड, हारकोल, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, देवळी, टोळ,टोळ खुर्द आदी सर्वच गावांतून रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली.

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत मुस्लिम बांधवानी रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली. या वेळी मौलाना हाजिमिया जामदार यांनी कुराण पठण करून उपस्थित मुस्लिम बांधवाना रमजान ईदचे महत्त्व सांगितले.

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात सोमवार दि.३१ मार्च रोजी 'रमजान ईद' उत्साहात आणि आनंदात साजरी झाली.संपूर्ण

दिवसभर ईदचा उत्साह दिसून येत होता.हिंदू आणि मुस्लिम ऐक्याची भावना अन जातीय सलोख्याचे ऋणानुबंध जपत येथील सर्व समाज बांधवांनी आपल्या मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि माथेरान मध्ये रमजान ईद अगदी उत्साहात साजरी झाली.

सालाबादप्रमाणे याहीवर्षी माथेरान मधील सर्वच समाजबांधवांनी 'रमजान ईद' निमित्त आपल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी मुख्य बाजारपेठेतील जामा मशिदी बाहेर सकाळपासूनच गर्दी केली होती.

यामध्ये माजी नगराध्यक्ष अजय सावंत, मनोज खेडकर, विवेक चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, रिक्षा संघटनेचे सचिव सुनिल शिंदे, भाजपचे किरण चौधरी, माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सुतार, वनव्यवस्थापन समिती अध्यक्ष योगेश जाधव आणि माथेरान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यासर्व मंडळींनी माथेरान मधील सर्व मुस्लिम समाज बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.



**खोपोली : प्रतिनिधी**

रमजान ईदनिमित्त खोपोलीत सामाजिक सलोख्याचे दर्शन पहावयास मिळाले. ईद निमित्त नमाज झाल्यानंतर हिंदू बांधवांच्या तर्फे मशिदीबहेर ईद निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना नेते डॉक्टर सुनील पाटील, माजी नगरसेवक व ज्येष्ठ कार्यकर्ते राजेंद्र फक्के, यांनी मशिदीच्या प्रवेशद्वारावर जाऊन मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देऊन इच्छा शुभेच्छा दिल्या माजी नगरसेवक नाशिक पटेल, ज्येष्ठ नेते आयुब पटेल, त्याचप्रमाणे मुस्लिम समाजाचे ज्येष्ठ नेते त्याचप्रमाणे खोपोली पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत हेही जातीने उपस्थित होते.



खोपोली शहरात वर्षानुवर्षे जातीय सलोखा राखण्याचे काम दोन्ही समाजातर्फे नेहमीच करण्यात आल्याचे या वेळी माजी नगरसेवक राजेंद्र फक्के यांनी केले. व ही परंपरा भावी पिढी नेहमीच सुरू ठेवतील, अशी आशा त्यांनी या वेळी व्यक्त केली.

**पाली : प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात मुस्लिम बांधवांनी रमजान ईदचा पवित्र सण अत्यंत उत्साही वातावरणात साजरा केला. रायगड जिल्ह्यातील बेणसे येथील जामा मस्जिद मध्ये सोमवारी सकाळी मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून ईद सण उत्साहात साजरा केला. या वेळी मुस्लिम बांधवांची नमाज अदा करण्यासाठी गर्दी झाली होती.

बेणसेत रमजान ईदनिमित्त हिंदू मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन घडले. येथील मस्जिद मध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, व सर्व धर्मीय बांधवांनी एकत्रित येत शांतता पूर्ण व एकोपा जोपासत ईदचा आनंद द्विगुणित केला. या वेळी गळाभेट घेत एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मुस्लिम बांधवांनी अत्यंत उत्साही वातावरणात ईद सण साजरा केला.

उपस्थित मान्यवर व नागरिकांना मुस्लिम बांधवांनी गुलाब पुष्प व गोड पदार्थ देत रमजान ईद च्या शुभेच्छा दिल्या. पवित्र रमजान सुरू असताना लहान मुले तरुण व मुस्लिम बांधवांनी रोजे (उपवास)देखील करण्यात आला. ईदनिमित्त पांढरे वस्त्र परिधान करून मुस्लिम बांधवांनी नमाज पठण केले.

या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्तदेखील ठेवण्यात आला होता.



# कॉँक्रीटीकरणामुळे मुरूडची रस्ते समस्या नष्ट होणार -आमदार दळवी

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते मराठी नववर्ष गुढी पाडवा निमित्ताने त्यांच्या मतदार संघातील दोन प्रमुख रस्त्यांचे भूमिपूजन सोहळा मोठ्या दिमाखात त्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

रेवदंडा पुल ते कोर्लई, बोर्ली मुरूड एम. एस. एच. ४ किमी २८०/७४५ ते ३१०/१४५ साठी कॉँक्रीट पेव्हमेंट रस्त्याचे बांधकाम आणि पुल व कलवर्ट चे पुर्णबांधणी व रूंदी करण एकुण लांबी २९.४० किमी या रस्त्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून १३९ कोटी ४८ लाख रुपये खर्च करण्यात येऊन या रस्त्याचे रुंदीकरण व कॉँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे साळाव ते तळेखार त्याच प्रमाणे नागाव व अन्य भागात कॉँक्रिट रस्ते व रुंदीकरणासाठी १७१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.यासाठी या दोन्ही मुख्य रस्त्यांचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता दिलीप भिंगे, मुख्य व्यवस्थापक दिलीप वर्गीस, मुरुड तालुका बांधकाम सेना अध्यक्ष- दिनेश मिनमीने, शिवसेनेचे जिल्हा उप प्रमुख भरत बेलोसे, अलिबाग तालुका प्रमुख आप्पा गोंधळी, रमेश गायकर, शिवसेनेचे नेते भाई सुर्वे, तालुका उपप्रमुख भगीरथ पाटील, बोरली ग्रामपंचायत सरपंच स्वप्ना जायपाटील, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, नियोजन मंडळ सदस्य नीलेश घाटवळ, मुरुड तालुका संघटक यशवंत पाटील, युवक नेते अमोल लाड, राजू रंजन, सी.एम.ठाकूर, मनोज कमाने, माजी उपसभापती चंद्रकांत मोहिते आदी उपस्थित होते.

या वेळी उपस्थित लोकांना मार्गदर्शन करताना आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मार्फत रस्ते कॉँक्रीटचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. कॉँक्रीटचे रस्ते हे दीर्घ काळ टिकणारे असून मुरूड तालुक्यातील जनतेची रस्ते समस्या कायम स्वरुपी निकाली निघणार आहे. रस्ते मजबूत व दीर्घ काळ टिकणारे बनवल्यामुळे मुरुड तालुक्यात पर्यटनवृद्धीसद्धा होणार आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.



## तेलवडे येथे हनुमान मूर्ती स्थापना दिन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नजिकच्या तेलवडे ग्रामस्थ मंडळातर्फे श्री हनुमान मुर्ती स्थापनेचा १२५वा वर्धापन दिन वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असुन जिर्णोधार कार्यक्रमाचे २६ वे वर्ष ग्रामस्थ मंडळ तेलवडे व अंजली माता महिला मंडळातर्फे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करून ऐक्य व एकात्मतेचा परिचय दिला. अपार श्रध्देने अबाल वृद्धांची दिंडीतील उपस्थिती आनंददायी होती.

संपूर्ण मंदीर परिसर रोषणाई, फुलांची आरास व सुंदर रांगोळ्यानी उत्कृष्टपणे सजवला होता. सकाळी ६ वा पासून जलाभिषेक, श्री गणेश स्तोत्र व मारुती स्तोत्र पठण कार्यक्रम घेण्यात आले त्यानंतर गावात पारंपारिक वेशात खालुबाजे व ढोल ताशांच्या गजरात दिंडीचे आयोजन करण्यात आले. दुपारी ११ ते ३ लघुरुद्र, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी भाविक मंडळ तेलवडे यांचे भजन तर खारआंबोली भजनी मंडळातर्फे प्रासादिक भजनाचा कार्यक्रम झाला.

रात्री ह.भ.प.उत्तम महाराज बडे, (देवाची आळंदी) यांचे सुश्राव्य कीर्तन सोहळ्यास पंचक्रोशीतील महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.



## राजिप आरोग्य विभागातर्फे रोह्यात एनसीडीचे किट वितरण

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागाच्या वतीने उच्च रक्तदाब व मधुमेह रुग्णांना उपचारायचे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रोहा पंचायत समितीमध्ये एनसीडी किट रुग्णांना वाटप करण्यात आले. या वेळी रोहा पंचायत समितीच्या आवारात हिरकणी कक्षाचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस नंदकुमार म्हात्रे, तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, महिला अध्यक्ष प्रितम पाटील, डॉ. माजी उपसभापती अनिल भगत, तहसीलदार किशोर देशमुख, गटविकास अधिकारी सुभदा पाटील, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रिया साळुंखे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, महेश वाघ, नायब तहसीलदार राजेश थोरे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, सरपंच रामाशेठ म्हात्रे, जनार्दन मोरे, विस्तार अधिकारी महेंद्र फडतरे, सुनील गायकवाड आदी उपस्थित होते. शुभदा पाटील यांनी प्रास्ताविकात रोहा तालुक्यातील मधुमेह रुग्णांना राजिप कडील निधी मधुन आगावु तीन महीन्यांचे आरोग्य किट वितरण करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयेश भोईर यांनी केले आहे.




## टेंभरी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील महिलांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी यांनी राबविलेल्या माझी वसुंधरा अभियान ५.० यासाठी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील महिलांनी वर्षभर मोठा प्रतिसाद दिला, त्याचा यथोचित सन्मान ग्राम पंचायत टेंभरी यांनी केल्याने महिला आनंदी झाल्या होत्या.

निसर्गाच्या पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश पंचतत्वासोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैव विविधतेचेही अस्तित्त्व राहणार नाही. म्हणून ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी यांनी ग्राम पंचायत हद्दीतील महिलांना सोबत घेऊन तेथे या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपूरक जीवनपद्धती अवलंबिण्यासाठी माझी वसुंधरा हे अभियान यशस्वी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

या अभियानाचा समारोप करताना महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता.





या वेळी विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला,तर ज्या महिलांनी सक्रिय सहभागी होऊन माझी वसुंधरा अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले त्यांचाही सन्मान केला. स्वच्छ पाणी, स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड, वृक्ष जोपासणे, प्लास्टिक मुक्ती, फटाके फोडण्यावर बंदी, अभियान शपथ, जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले, असे ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदास राठोड यांनी सांगितले.

महिला सदस्या प्रतिभा भोईर, दर्शना फाटे, अंजना भोईर, अर्पणा पवार, निताली बामणे, आशा कातकरी, स्वप्ना ठोंबरे यांच्यासह ग्राम पंचायत हद्दीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आदिवासी महिलांना मोफत शिलाई मशीन वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या माणगाव चारिझन फाउंडेशन तर्फे आदिवासी महिलांना रविवारी (दि.३०) गुढीपाडवा सणाचे औचित्य साधून मोफत शिवण मशीन देण्यात आले.

या कार्यक्रमाला माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, युवा नेते सुमित काळे,सौरभ खैरे,आधार फाउंडेशनचे संस्थापक निमिष वाघमारे, अमरदीप फाउंडेशनचे कार्यकर्ते यांच्यासह संपूर्ण चारिझन फाउंडेशनची टीम उपस्थित होती. चारिझन फाउंडेशनच्या या निःस्वार्थ उपक्रमाबद्दल मान्यवरांनी फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा व त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक कौतुक केले.

अमरदीप फाउंडेशनचे कार्यकर्ते व चारिझन फाउंडेशनचे उपाध्यक्ष सतीश काळे, पीआरओ विजयश्री कराड, विलास आठवले, अनिल कराड, किशोर जेमसे व संपूर्ण टीममुळेच हा शिवण वर्ग उपक्रम यशस्वीपणे पार पडला असे फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांनी सांगितले. सूत्रसंचालन फाउंडेशनचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ यांनी करून सादर कार्यक्रम उत्साहात झाला.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## नावात बदल

माझे जुने नाव **अखिलेश कुमार रमाकांत यादव**, राहणार आर ५२, नवीन कंपाउंड, पत्रा चाळ, हत्ती बाग, माझगाव मुंबई ४०००१०, राज्य महाराष्ट्र, हे माझे जुने नाव असून मी **गॅझेट (राजपत्र) क्र. एम २४४१७७५६ दि. १३ मार्च २०२५** रोजी **अखिलेश कुमार यादव** असे बदलले असून मी **अखिलेश कुमार यादव** या नवीन नावाने ओळखला जाईन.

**दि. ०१/४/२०२५**

**सही/-**
**अखिलेश कुमार यादव**
नवीन नाव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील रेव्हेन्यु रेकॉर्ड मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे सामाईक मालक व कब्जेदार रवींद्र कृष्णा म्हात्रे, संतोष कृष्णा म्हात्रे, दिलीप कृष्णा म्हात्रे, शोभा धावजी पाटील, गजानन कृष्णा म्हात्रे, शारदा अशोक म्हात्रे, वरण अशोक म्हात्रे, प्रसाद अशोक म्हात्रे, पूजा शांतीलाल घरत, दर्शन शरद म्हात्रे, प्रवेश शरद म्हात्रे, चेतना शरद म्हात्रे (खाते क्र. १९१) व सुनिल अभिमन्यू भोइर (खाते क्र.२०२) यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| अनु क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-प्र.) | आकार (रु.-पै.) |
|---|---|---|---|
| १. | ७५/१+२+३/क (खाते क्रमांक १९१) | ०-२६-२० | ३-०६ |
| २. | ७५/१+२+३/क (खाते क्रमांक २०२) | ०-१६-० | ३-०० |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरू पणाचा हक्क, साठेकरार, कुळमुखत्यारपत्राने करार, मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी, इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, आक्षेप, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती, आक्षेप, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०४/२०२५
ठिकाण : पनवेल

**मार्फतः**
**ॲड. दीपा बिष्ट,**
द्वारा तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०, ऑगस्ट क्रांती मार्ग,
शालिमार हॉटेल समोर, केम्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६.
ई-मेल: adv.deepabisht@gmail.com

# पारसिक टेकड्यांवरील झाडांची कत्तल

## सायन-पनवेल महामार्गावर भूस्खलनाची भीती



**नवी मुंबई : बातमीदार**

हवामान बदलाचा शहरावर विपरीत परिणाम होत असतानाही, सिडको मुख्यालयाजवळील पारसिक टेकड्यांवर शंभराहून अधिक पूर्ण वाढलेली झाडे तोडण्यात आली आहेत, असे पर्यावरणवाद्यांनी सांगितले आणि सायन-पनवेल महामार्गावर भूस्खलनाचा इशारा दिला.

झाडे तोडणे हे मानवांच्या हत्येपेक्षाही वाईट आहे या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील निरीक्षणाकडे लक्ष वेधून, नॅटकनेक्ट फाउंडेशनने पारसिक टेकडीवरील झाडे तोडणाऱ्यांना अनुकरणीय शिक्षा देण्याची मागणी केली.

सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीरपणे कापलेल्या प्रत्येक झाडासाठी एक लाख रुपये दंड ठोठावला आहे, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

पर्यावरणाच्या काळजीबद्दल सिडकोच्या सततच्या उदासीनतेमुळे नाराज होऊन, नॅटकनेक्ट म्हणाले की ते राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे दाद मागण्यासाठी कायदेशीर पथकांशी सल्लामसलत करेल.

या बेकायदेशीर कृत्यामुळे पावसाळ्यात भूस्खलन होण्याची शक्यता आहे आणि लोक आणि मालमत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे पर्यावरण-केंद्रित स्वयंसेवी संस्थेने म्हटले आहे.

सेव्ह बेलापूर हिल्स फोरमचे कपिल कुलकर्णी म्हणाले की, टेकड्यांवरील बेपर्वाईने झाडे तोडणे ही एक नित्याची बाब बनली आहे आणि अधिकाऱ्यांनाही त्याची काळजी नाही. बेलापूर हिलवरील झाडे उपटून टाकल्याने माती सैल झाली आहे, ज्यामुळे अलिकडच्या काळात दोनदा भूस्खलन झाले आहे, परंतु दुर्दैवाने, सिडकोने कारवाई करण्याची गरज आहे.

हवामान बदल ही काही विज्ञानकथा नाही हे सिडकोला समजण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले. एकीकडे सरकार छतावरून ओरडत आहे की आपण झाडे लावली पाहिजेत आणि वाचवली पाहिजेत, तर दुसरीकडे शहर नियोजनकारांना वृक्ष संरक्षणाची काळजी नाही, असे कुमार म्हणाले.

झाडे वाढण्यास किमान १० ते १२ वर्षे लागतात आणि काही तासांतच ती नष्ट होतात, असे त्यांनी खेद व्यक्त केला. सिडको अंतर्गत खारफुटी आणि पाणथळ जागांचा नाश होत असताना, वृक्षतोड ही तथाकथित शहर नियोजनकाराच्या पर्यावरणाबद्दलच्या नकारात्मक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे, असे खारघर हिल्स अँड वेटलँड्सच्या कार्यकर्त्या ज्योती नाडकर्णी म्हणाल्या.

नॅटकनेक्टने आठवण करून दिली की वन विभागाने मानवाधिकार आयोगाला वृक्षतोडीच्या दुसऱ्या एका प्रकरणात पुष्टी दिली आहे की पारसिक टेकड्या सिडकोच्या अंतर्गत येतात. कुमार यांनी निदर्शनास आणून दिले की शहरात हवेचा दर्जा निर्देशांक महिनोनमहिने खराब राहतो आणि लोकांना विष श्वास घेण्यास भाग पाडले जाते. नवी मुंबईला दाट वृक्षाच्छादनाची आवश्यकता असताना, चुकीच्या शहरी नियोजनाला हिरवळीची पर्वा नाही, असे त्यांनी खेद व्यक्त केला.

पर्यावरणवाद्यांनी टेकड्या स्थानिक आणि फळे देणारी झाडे लावून बळकट करण्याचा आणि अशा प्रकारे शहराची जैवविविधता जपण्याचा सल्ला दिला.

# थकीत कर वसुलीसाठी नवी मुंबई महापालिकेची ढोल ताशे मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

थकीत मालमत्ताकर भरण्यासाठी नोटीसीद्वारे सूचित करूनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या मालमत्ताधारकांवर नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार मालमत्ताकर विभागाने कारवाईचा बडगा उचलण्यास सुरुवात केली आहे.

महापालिकेच्या तुर्भे विभाग कार्यालयाने रेनबो बिझनेस पार्क येथील हावरे कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये मालमत्ताकराची थकबाकी करणाऱ्या २३२ आस्थापनांबाहेर ढोलताशे वाजवून त्यांना कर थकबाकी भरण्यासाठी जागे केले. एक कोटी २५ लाख रुपयांची मालमत्ताकर थकबाकी करणाऱ्या थकबाकीदारांच्या नावांची यादीही हावरे कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये जाहीरपणे लावण्यात आली. ही कारवाई नवी मुंबई महापालिकेच्या तुर्भे विभाग कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी संजय तडवी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली.

कर थकबाकीदारांच्या कारवाईविषयी संजय तडवी यांनी माहिती दिली असून त्यानुसार हावरे कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये एकूण २५३ आस्थापना आहेत. त्यातील २१ आस्थापनांनी मालमत्ताकर भरलेला आहे. उर्वरित २३२ आस्थापनांबाहेर ढोलताशे वाजवून त्यांना मालमत्ताकर भरण्यासाठी जागे करण्यात आले. शिवाय थकबाकीदारांच्या नावांची यादी त्यांनी करभरणा करणे बाकी असलेल्या रकमेसह त्यांच्या आस्थापनांबाहेर लावण्यात आली. ३१ मार्च २०२५ पूर्वी मालमत्ताकराची थकबाकी भरा, अन्यथा मालमत्ता सील करण्यात येईल असा इशाराही कर थकबाकीदार आस्थापना मालकांना देण्यात आला आहे.

प्रशासकीय अधिकारी संजय तडवी यांच्या टीमने यापूर्वी वाशीच्या एपीएमसी मार्केट येथील एक्स्पोर्ट भवनमधील १० आस्थापनांवर कार्यवाहीचा बडगा उचलला होता. या आस्थापनांची ५६ लाख रुपयांची मालमत्ताकर थकबाकी असल्यामुळे त्यांना नवी मुंबई महानगरपालिकेद्वारे सील लावण्यात आले होते. दोन दिवसांत या मालमत्ताकरधारकांनी थकबाकी भरल्यामुळे त्या सीलमुक्त करण्यात आल्या असल्याची माहिती संजय तडवी यांनी दिली.

अशाप्रकारे करवसुलीची कार्यवाही नवी मुंबई महापालिकेने इतरही ठिकाणी केली. तुर्भेच्या भूमिराज सोसायटीमध्ये ढोलताशे वाजवून २.५ कोटी रुपयांची करवसुली करण्यात आली. नेरूळच्या अमेय सोसायटीने ३.५ कोटी रुपये मालमत्ताकराचा संपूर्ण भरणा केल्यामुळे सील केलेल्या मालमत्ता मोकळ्या करण्यात आल्या.

मालमत्ताकर थकबाकीदारांना कर भरण्यासाठी कोणतेही आर्थिक दडपण येऊ नये यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने 'अभय' योजना सुरू केली आहे. मालमत्ताकर थकबाकीवरच्या शास्तीवर ५० टक्क्यांची सूट देणाऱ्या अभय योजनेचा लाभ घ्यावि आणि ३१ मार्च २०२५ या तारखेपूर्वी २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा मालमत्ताकर भरावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# ब्राह्मण सभेचा वर्धापन दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेचा १९वा वर्धापन दिन सोहळा झाला. पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह येथे झालेल्या सोहळ्यात सभासदांनी सादर केलेल्या दोन एकांकिका हे कार्यक्रमाचे आकर्षण होते.

> *ब्राह्मण समाजापुढील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक आव्हाने पाहता समाजाने सुसंघटित होणे ही काळाची गरज आहे या उद्देशाने संस्था पनवेलमध्ये कार्यरत आहे. त्याचबरोबर विविध प्रकारचे सामाजिक कार्यही संस्था करत आहे.*
>
> **-दीपाली जोशी,** अध्यक्ष, ब्राह्मण सभा, नवीन पनवेल

प्रारंभी वेदमंत्रांच्या घोषात दीपप्रज्वलन संपन्न झाले. यानंतर नीलिमा देशपाण्डे लिखित व मोहन हिन्दुपूर दिग्दर्शित नाट्यकल्लोळ या विनोदी व संगीतमय एकांकिकेचे सादरीकरण झाले. त्यानंतर प्रा. प्रल्हाद जाधव लिखित ऑपरेशन दगड या प्रबोधनपर एकांकिकेचे सादरीकरण झाले. त्याचे दिग्दर्शन मिलिंद मोघे यांनी केले. गंधार देशपांडे यांनी की बोर्ड व मयुरेश साठे यांनी तबलासाथ केली. सोहम व्यवहारे यांनी प्रकाशयोजना केली. शीतल कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

डॉ. कीर्ती समुद्र, मिलिंद गांगल व हेमंत भावे यानी या सोहळ्यासाठी मोलाचे योगदान दिले. या कार्यक्रमात संस्थेच्या ज्येष्ठ सभासदांना सन्मानित करण्यात आले.

# 'केबीपी'मध्ये रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांची पुण्यतिथी

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा ९५वा स्मृतिदिन वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये शनिवारी (दि.२९) करण्यात आला.



या वेळी महाविद्यालयातील रयत सेवक प्रणाली राजे व अमोल नगराळे यांनी यांनी लक्ष्मीबाई पाटील यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाशझोत टाकला. त्यांनी रयत माऊली लक्ष्मीबाई एक आदर्श पत्नी, एक आदर्श माता कशा होत्या या अनुषंगाने आपले विचार मांडले तसेच रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीमध्ये त्यांच्याकडे असलेली समर्पण वृत्ती किती महत्त्वपूर्ण ठरली या विषयी त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी लक्ष्मीबाईचे विचार व कार्य लक्षात घेऊन, रयत सेवकांनी ते आचरणात आणावे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सेवक हेमंत मढवी, सोनल गायकवाड, युगंधरा लाळे, प्राजक्ता कोळी व लोंढे यांनी रयत माऊली गीत गायले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला सक्षमीकरण समितीच्या चेअरमन ग्रंथपाल मानसी रसाळ यांनी केले. ज्योती खैरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, तर अंकिता पोयरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. राजेश्री घोरपडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

# आजपासून आपटा कोळीवाड्याची मानाची पालखी

**रसायनी : प्रतिनिधी**



आपटा कोळीवाडा मानाची पालखी पदयात्रा १ एप्रिल २०२५ रोजी सुरू होत आहे. या वेळी आपटा मानाची पालखी आपटा कोळीवाडा ते श्री क्षेत्र एकविरा कार्ला पदयात्रा सोहळा होत आहे.

१ एप्रिल २०२५ रोजी आपटा कोळीवाडा मानाची पालखी छबिना संपूर्ण आपटा कोळीवाडा येथे फिरणार आहे. २ एप्रिल २०२५ रोजी देवीची आरती येऊन पालखी सोहळा सुरुवात दुपारी विश्रांती बापदेव मंदिर खालापूर येथे होणार आहे. ३ एप्रिल २०२५ रोजी आमदार रमेश दादा यांच्या फार्म हाऊस माहेरघर येथे पालखीची मिरवणूक होईल व पालखी आई एकविरा कार्ला येथे आगमन होईल. ४ एप्रिल २०२५ रोजी देवीची आरती येऊन पालखी गडावर प्रस्थान होईल. ५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी पूजा आरती होऊन मानपानाचा कार्यक्रम होईल.

अशा पद्धतीने ही आपटा परिवार मानाची पालखी पदयात्रा सोहळा होत आहे, अशी माहिती आयोजक आपटा कोळी समाज आपटा यांनी दिलेली आहे.

# शाहू महाराज उद्यानाची वेळ वाढविण्यासाठी स्वाक्षरी मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**



नेरूळ रहिवासी संघ यांच्या वतीने छत्रपती शाहू महाराज उद्यानाची रात्रीची वेळ संध्या ५ ते ११ वाजेपर्यंत वाढण्यासाठी स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली.

नेरूळ विभागात नोकरदार-चाकरमानी वर्ग असल्याने नोकरीनिमित्त गेलेला रहिवाशी घरी उशिरा पोहचत असतो. रात्रीचे जेवण झाल्यानंतर शतपावली करण्यासाठी उद्यानात जातो, मात्र उद्यान रात्री ९ वाजता बंद करण्यात येते. उद्यान बंद असल्याने स्थानिकांना रस्त्यावर रात्री फिरावे लागते. त्यामुळे नागरिकांचा हिरमोड होत आहे. स्वराज्य पक्षाचे सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील घोलप यांनी या स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन केले होते.

लहान मुलांसाठी तसेच नागरिकांनादेखील फेरफटका मारण्यासाठी व्हावा हा उद्देश लक्षात ठेवून उद्याने तयार करण्यात आली आहेत, मात्र दिवसभर जास्त करून प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या करदात्या नागरिकांना मात्र त्याचा वापर होत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. त्यामुळे उद्यानाची वेळ वाढवण्याची मागणी नागरीक करत आहेत.

नागरिकांच्या या मागणीचा विचार करत उद्यानाची वेळ ही रात्री अकरा वाजेपर्यंत वाढवण्यात यावी त्यासाठी नेरूळ शहर रहिवाशांच्या वतीने आपण स्वाक्षरी मोहीम आयोजित केलेली होती. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेला गाडी

**कळंबोली : बातमीदार**



हिंदुस्तान कोलास प्रायव्हेट लिमिटेड कंपनी (तुर्भे) यांच्यातर्फे डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत स्मार्ट क्लास व ईको गाडीचे हस्तांतरण करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जोपासून समाज कार्य करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाचे फाउंडेशनचे अध्यक्ष नंदकुमार जाधव यांनी आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमांमध्ये हिंदुस्तान कोलास लिमिटेड कंपनीचे अद्वेश सिंग कुशवाह, हरेंद्र सिंग, दिगंबर कोहले, सुधाकर सानप, प्रदीप सिंग, दिलीप परेरा, डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नंदकुमार मारुती जाधव, संस्थेचे सचिव सुरेश जाधव, संस्थेचे खजिनदार, अतुल वाणी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रेया जाधव शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

हिंदुस्तान कोलास प्रायव्हेट लिमिटेडचे अधिकारीवर्ग यांनी शाळेस भेट दिली. शाळेत चालणारे कामकाज पाहिले. सीआरसी प्रोजेक्ट अंतर्गत शाळेसाठी एक स्मार्ट क्लास यांच्यातर्फे बनवून देण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी इको गाडी शाळेला दिली.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : सलग सुट्ट्या आल्यामुळे जंजिरा पाहण्यासाठी राजपुरी येथील नवीन जेटीवर पर्यटकांनी गर्दी होती. शिडाच्या बोटीत बसून समुद्राच्या पाण्याला हात लावत जंजिरा किल्ल्यात जाण्याचा आनंद घेतानाही पर्यटक दिसून आले.** (छाया : सुधीर नाझरे)

# मोहोपाडा येथील राम मंदिरात कीर्तन

**रसायनी : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील राम श्रीराम मंदिर येथे ३० मार्च ते शनिवार ५ एप्रिल २०२५ या रोजी संध्याकाळी ५ ते ६.३० या दरम्यान श्रीराम जन्माचे कीर्तन होणार आहे. रविवार ६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम जन्माची कीर्तन होणार आहे.

रोज संध्याकाळी चार ते पाच या दरम्यान सामूहिक रामनाम जप होणार आहे. हा कीर्तन सोहळा हभप स्नेहलता श्रीपाद साठे तळेगाव दाभाडे या पुणे आकाशवाणी कीर्तन कलाकार आहेत या कीर्तन सादर करणार आहेत. हे कीर्तन सोमण यांच्या श्री राम मंदिर मोहोपाडा येथे होणार आहे, भाविकांनी या कीर्तनाचा श्रवण करावे लाभ घ्यावा.

# बजरंग दलाच्या मावळ अध्यक्षपदी जनार्दन मालुसरे



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद व बजरंग दल रसायनी पाताळगंगा प्रखंडाचे याअगोदरील अध्यक्ष जनार्दन अनंत मालुसरे यांच्या कार्याची दखल घेवून त्यांची आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या लोकसभा अध्यक्षपदी तर मोहोपाडा येथील मलेश गुडसे यांची रायगड जिल्हा गोरक्षा विभाग सहमंत्री म्हणून निवड करण्यात आली.

मोहोपाडा श्री साई मंदिराच्या सभागृहात शुक्रवारी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे कोकण प्रांत संघटनमंत्री सचिन धुळे, जिल्हाध्यक्ष बाबू भोईर यांच्याहस्ते नियुक्ती पत्र देवून निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले. या वेळी बजरंग दलाचे प्रशांत तांबोळी, दिनेश पडवल, संदिप तांबोळी, केतन जाधव, रविंद्र गायकवाड, सतीश महाडिक, राजेंद्र जांभुळकर, भक्ती बाबर, विशाल जैस्वाल, किस्तुर कुमावत आदीसह परिसरातील बजरंगी बांधव उपस्थित होते.

# वाढत्या उष्म्याचा शेतकरी अन् मच्छीमारांनाही बसतोय फटका

## रोजगाराचे मार्ग प्रभावित; दैनंदिन जीवनावरही परिणाम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक, विशेषतः शेतकरी आणि मच्छीमार वर्ग वाढत्या उष्म्यामुळे गंभीर अडचणींचा सामना करत आहेत. दिघीच्या टोकापासून बागमांडलापर्यंत उष्मा अधिक तीव्र झाला आहे, ज्यामुळे लोकांचे दैनंदिन जीवन आणि रोजगाराचे मार्ग प्रभावित झाले आहेत. उष्णतेच्या झळांनी शेतकरी व मच्छीमारांचे जीवन कठीण बनवले आहे.

वाढत्या तापमानामुळे शेतकरी आणि मच्छीमार यांच्या कामावर मोठा परिणाम झाला आहे. शेतकरीवर्ग उन्हाच्या तडाख्यामुळे शेतात काम करत असताना शारीरिक थकवा आणि मानसिक ताण सहन करत आहेत. उन्हाळ्यात शेतातील दाणेदार कामे म्हणजेच पालापाचोळा ठेवणे, भाजणी करणे आणि इतर कामे करणे जिकिरी होऊन बसले आहे. परिणामी शेतकरी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा काम करीत आहेत आणि मध्य भागात उन्हाच्या तडाख्यापासून वाचण्यासाठी घरीच राहण्याचा निर्णय घेत आहेत.

याचप्रमाणे मच्छीमार वर्गदेखील या उष्णतेमुळे त्रस्त झाला आहे. समुद्रातील पाणी उष्ण होऊन गेल्याने मासेमारीत कमी होणारी उत्पन्नाची संधी आणि समुद्रावर असलेल्या कडक हवामानामुळे काम करणे कठीण झाले आहे. उष्णतेमुळे समुद्राची परिस्थिती बदलली आहे, ज्यामुळे मच्छिमारांना त्यांचा व्यवसाय करणे जवळपास अशक्य बनले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शेतकाम करताना उन्हापासून वाचण्यासाठी छावणी किंवा वर्किंग शेड्सची आवश्यकता आहे. उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी शेड्स किंवा तात्पुरत्या छावण्याच्या सहाय्याने उष्मापासून वाचण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय मच्छीमारांसाठीदेखील समुद्रावर काम करताना पाणीपुरवठा, छायेत आराम करणे, आणि शीतलता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून मच्छीमारांच्या कामात असलेल्या अडचणी कमी होऊन त्यांचा रोजगार सुरक्षित राहील.

उष्माघातामुळे होणारा त्रास आता फक्त शेतकऱ्यांपर्यंतच मर्यादित नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण समुदायावर पडतोय. उष्म्यामुळे शारीरिक थकवा आणि मानसिक ताण इतके वाढले आहेत की, लोक सामान्य कामकाज करताना अपघात किंवा शारीरिक कमजोरीला तोंड देत आहेत.

सध्या सर्वसामान्य लोकांना उन्हाळ्यात बाहेर जाऊन काम करणे अशक्य होऊन बसले आहे. लोक स्वच्छता, आरोग्य, आणि कामाची उत्पादकता यावरही परिणाम करत आहेत. एकंदर वाढत्या उष्मा सर्वांनाच त्रासदायक ठरत आहे.

### उपाययोजना करण्याची मागणी

***उष्माघातामुळे नागरिकांना होणारा त्रास वाढत असताना प्रशासनाने त्वरित उपाययोजना सुरू करणे आवश्यक आहे. उष्णतेमुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांबाबत नागरिकांना जागरूक करणे आवश्यक आहे. पाणी साठवण, जलव्यवस्थापन, शेतकऱ्यांसाठी शेड्स आणि मच्छीमारांसाठी छायेत काम करण्यासाठी सुविधा दिल्या पाहिजेत. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना तांत्रिक मदतीचा आधार मिळावा आणि मच्छीमारांनाही आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित माहिती व संसाधने मिळणे गरजेचे आहे.***

# मुरूडमधील काकळकर येथे जलसंवर्धन जनजागृती कार्यक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

केंद्र सरकार संचालित नेहरू युवा केंद्र संघटन रायगड-अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था रेवदंडा-अलिबाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यातील काकळघर येथील पीएनपी शैक्षणिक संकुलात जागतिक जल दिन हा जलसंवर्धन जनजागृतीद्वारे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास माजी ग्रामपंचायत सदस्य गीता नागोटकर, ओएसिस संस्थेचे सहखजिनदार सार्थक गायकवाड, उपक्रम प्रभारी दर्श नागोटकर, सामाजिक कार्यकर्ते प्रतीक कोळी, शैक्षणिक संकुलाच्या मुख्याध्यापिका वैभवी मेहतर, सहाय्यक शिक्षिका संपदा भोईर, संगीता पाटील आदी उपस्थित होते.

आपल्या भावी पिढीसाठी निसर्गाचे आणि निसर्गातील प्रत्येक घटकाचे संवर्धन करायचे असेल तर जलसंवर्धन करूया, असे आवाहन प्रतिक कोळी यांनी केले. इतर मान्यवरांनीही विचार मांडले.

या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा विजेत्यांचा पदक, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संकुलातील सहाय्यक शिक्षक मनोज सुर्वे यांनी केले, तर आभार नंदू वारगुडे यांनी मानले.




# नवाबकालीन ईदगाहवर दोन हजार मुस्लीम बांधवांनी अदा केली रमजान ईदची नमाज

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड परिसरात रमजान ईद सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. पूर्ण महिनाभर निर्जल उपास पकडून आराधना केली जाते व आमावस्येनंतर पहिली चंद्रकोर पाहून ईद साजरी केली जाते. ईदची पहिली नमाज नावाबकालीन ईदगाहवर मुस्लीम बांधव अदा करतात. ईदगाहची नमाज होतच मुरूड पोलीस ठाण्याकडून पीआय नामदेव बंडगर व सहकारी यांनी गुलाबपुष्प देऊन सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्या दिल्या.



मुरूडमधील ईदगाहची वस्तू १९३८ साली त्या वेळचे नवाब सिद्धी अहमद खान यांनी येथील मुस्लीम बांधवांना बकरी ईदनिमित्त भेट दिली असे सांगितले जाते. संपूर्ण भारतात अनेक ईदगाह आहेत, परंतु मुरुड शहराच्या बाहेरील काही किलोमीटर अंतरावर असलेली ही ईदगाह वेगळी आहे.

ईदगाह ही अशी ठिकाणे आहेत जिथे ईदची नमाज अदा केली जाते. ते फक्त एकेरी किबला तोंडी भिंत बनवतात आणि त्यांना छप्पर नाही. हा ईदगाह पूर्व आफ्रिकन वंशाच्या जंजिरा संस्थानातील सिद्दी शासकांनी बांधला आहे.

इदगाहची नमाज झाल्यावर सर्व मुस्लीम बांधव एकमेकांना ईदच्या शुभेच्छया देतात. कुटुंबियांच्या घरी जाऊन शिरकुर्मा, विविध प्रकाचे पदार्थ खाऊन छोट्या मुलांना ईदी देऊन गरिबांना दान करण्याची प्रथा आहे. मुस्लीम मुले नवीन कपडे घालून सायकलला फुगे लावून वाजवत बाजारात फेऱ्या मारतात. समुद्रावर ईदनिमित्ताने बहुसंख्य बांधव व महिला फिण्याचा आनंद घेतात.

राजपुरी गावचे मुस्लीम बांधव सकाळी ७ वाजता ईदची पहिली नमाज जंजिरा किल्ल्यासमोर ईदगाहवर अदा करतात. हा इदगाह जंजिरा किल्ल्यासमोर समुद्रकिनारी असल्याने नमाज पडताना मागे किल्ला दिसतो. ही परंपरा खूप वर्षांपासून सुरू आहे.

हिंदू बांधवांची दिवाळी तशीच मुस्लिम बांधवांची रमजान ईद. त्यामुळे या दिनी मुस्लिम बांधव नवीन वस्त्र परिधान करून नमाज अदा करतात. आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी ते प्रार्थना करतात. या दिवशी अदा केलेली नमाज सलात-अल-फज्र या नावाने ओळखली जाते. कुराणातील मान्यतेनुसार पवित्र रमजानमध्ये संपूर्ण महिनाभर रोजे ठेवणाऱ्यांना अल्लाह बक्षीस आणि इनाम देतो. म्हणूनच या दिवसाला ईद म्हणतात, असे सांगितले जाते. संपूर्ण महिना प्रामाणिकपणे रोजा पूर्ण करण्यासाठी शक्ती, ताकद दिल्याबद्दल ईदच्या दिनी अल्लाहचे आभार मानले जातात. भूक, तहान यांची जाणीव माणसांना व्हावी या उद्देशाने रमजान महिन्यात रोजे ठेवले जातात. रोजा ठेवणे हे आद्य कर्तव्य मानले जाते.

# थकित बिलामुळे राष्ट्रसेवा तालुका वाचनालयाचा वीजपुरवठा खंडित

**खोपोली : प्रतिनिधी**

थकित वीज बिलाचा फटका खालापुरातील चोखंदळ वाचकांना बसला आहे. महावितरण कार्यालयाकडून खालापूरातील राष्ट्रसेवा तालुका वाचनालयाचा वीजपुरवठा खंडित केल्याने वाचनालयात अंधार पसरला आहे. वाचाल तर वाचाल या हेतूने शासन देखील ग्रंथालय टिकली पाहिजे यासाठी प्रयत्न करत असताना ७५ वर्षे जुने वाचनालयाचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

खालापूर राष्ट्रसेवा तालुका वाचनालय वाचन संस्कृती समृद्ध करत आहे. धार्मिक, चरित्र, बारा विश्वकोश, विनोदी, कथा, कांदबरी, ऐतिहासिक अशा विविध प्रकारच्या जवळपास ३३ हजार पुस्तकांचा खजिना वाचनालयात आहे. वाचन संस्कृतीची मुहूर्तमेढ खालापूरात सिंधुताई गोखले, गोविंदराव बोदार्डे व ग.ह. तथा आप्पासाहेब गोरे यांनी रोवली. रायगड जिल्ह्यातील त्याकाळी आणि काही अंशी आजही मागासलेल्या तालुक्याच्या खालापूरसारख्या गावात वाचनालय सुरू करणे अत्यंत अवघड गोष्ट होती. तिन्ही व्यक्ती राष्ट्रप्रेमाने प्रेरित असल्याने राष्ट्रसेवा तालुका वाचनालय २८ डिसेंबर १९५० रोजी सुरू केले. प्रथम घरोघर पुस्तके देणे-घेणे व लोकांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हे कार्य त्यांनी सुरू केले.

आप्पासाहेब गोरे यांनी वाचनालयाची इमारतीसाठी सरकार दरबारी प्रयत्न करून जागा मिळवली होती. आज तिथे विस्तार झाला असून सुसज्ज इमारतीत वाचनालय वास्तू आहे. वाचनालयालगत कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय, पहल ट्रेनिंग कार्यालय आणि वरच्या मजल्यावर व्यायामशाळा आहे. या सर्व ठिकाणी वाचनालयातून वीजपुरवठा होतो. थकीत बिलामुळे वीजपुरवठा खंडित केल्याने सर्वच ठिकाणी कामकाज ठप्प झाले आहे.

# मुख्याध्यापिका नम्रता पानसरे यांचे सुयश

**नागोठणे : बातमीदार**

राज्य शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी शिक्षकांसाठी राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत रोहा नगर परिषदेच्या पांडुरंग शास्त्री आठवले अष्टमी मराठी शाळा क्र. ३च्या मुख्याध्यापिका नम्रता नारायण पानसरे यांनी तालुका स्तरावर प्रथम, तर रायगड जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पनवेल तालुक्यातील विचुंबे देवद येथील आदर्श शिक्षण मंडळाचे श्री.डी.डी. विसपुते अध्यापक विद्यालय, सभागृहात झाला. या वेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेलचे नोडल अधिकारी सागर तुपे, प्राचार्य इरफान इनामदार, श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य, अधिव्याख्याते संतोष दौंड, रामदास टोने, श्री. कनशेट्टी, रोहा पं.स.च्या गट शिक्षणाधिकारी मेघना धायगुडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापिका पानसरे यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. याबद्दल रोहा नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजयकुमार एडके, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग यांनी पानसरे यांचे अभिनंदन केले.

# अखंड नामयज्ञ सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ मोहाचीवाडी येथील श्री साईबाबा मंदिराच्या ३३व्या वर्धापन दिनानिमित्ताने अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

दीपोत्सवाला हभप मारूतीमहाराज राणे यांच्यासह शिवराममहाराज तुपे, मधुकरमहाराज कराळे, माजी सभापती सुजाता मनवे, माजी सरपंच सावळाराम जाधव, माजी जि.प. सदस्य नागो गवळी, माजी उपसरपंच बल्लाळ जोशी, मंगेश म्हसकर, पोलीस अधिकारी प्रमोद देशमुख, नितीन मंडलिक, बाळकृष्ण पादीर, रामदास साळुंके, दादा पाटील आदींसह भाविक उपस्थित होते.

सुरुवातीला मंडळाचे अध्यक्ष अविनाश भगत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी उपाध्यक्ष बाळकृष्ण मिरकुटे, सचिव पद्माकर दळवी, लक्ष्मण भवारे, खजिनदार काशिनाथ ठमके, वसंत मिरकुटे, विश्वस्त सुरेश भवारे, चिंधू बाबरे, शैलेश पाटील, दत्तात्रय डायरे, पुष्पा जाधव, भालचंद्र दळवी, आंबो मिरकुटे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नरेशमहाराज पाटील यांनी केले.



# गुढीपाडवा शोभायात्रांना रायगडात प्रतिसाद

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथे दिमाखदार शोभायात्रा काढली जाते. यंदाही हिंदू नववर्ष स्वागत समितीमार्फत पालीमध्ये गुढीपाडव्यानिमित्त रविवारी (दि. ३०) भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर मंदिरापासून शोभायात्रेला सुरुवात झाली व समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाला.

भव्य शोभायात्रा ढोल पथक, ध्वज पथक व लेझीमच्या गजरात निघाली. पारंपरिक मराठमोळा पेहराव करून नागरिक शोभायात्रेमध्ये मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते तसेच लहान मुलांसाठी पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आयोजित केले होते. शोभायात्रेमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री बल्लाळेश्वरचे दर्शनदेखील घेतले. पालीमध्ये सर्वत्र उत्साहाचे व जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. नागरिक एकमेकांना नवीन मराठी वर्षाच्या शुभेच्छादेखील देत होते. शोभायात्रेमध्ये





नागरिकांसह मान्यवर व राजकीय मंडळीही सहभागी झाली होती. दरम्यान, गुढीपाडव्यानिमित्त पालीवाला महाविद्यालयाच्या पटांगणावर छावा हा चित्रपट मोफत दाखवण्यात आला.

**मुरूड : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाचे स्वागत करण्यासाठी मुरुड शहरात स्वामी नरेंद्रचार्य महाराज यांच्या भक्तगणांनी स्वागतयात्रा काढली होती. कोटेशवरी मंदिर येथून स्वागतयात्रेस सुरुवात झाली. अनेक लोक यामध्ये सहभागी झाले होते.

ढोल ताशाच्या गजरात पारंपरिक वेशभूषा, डोक्यावर नारळाचे कळस, लेझीम अशा विविध ढंगात शोभायात्रा निघाली. यात छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगे महाराज घोडेस्वार, बाईकस्वार असे अनेकजण वेगवेगळ्या पद्धतीने परंतु एकत्रित सहभागी झाले होते. रामायणातील विविध देखावे असलेला रथ आकर्षण ठरले. कोटेशवरी मंदिर येथून मारुती नाका परिसर, बाजारपेठ अशा विविध ठिकाणाहून स्वागतयात्रा फिरवण्यात आली. ती पहाण्यासाठी मुरुड शहरातील लोकांनी मोठी गर्दी केली होती.



# माथेरान पर्यटकांना खुणावतंय!

## वसंत ऋतूमधील निसर्गाचे रूप आकर्षण

**माथेरान : प्रतिनिधी**

निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी प्रत्येक ऋतूत निसर्ग आपली किमया दाखवत असतो. शिशिर ऋतूमध्ये पानगळती होऊन वसंत ऋतूमध्ये नवीन पालवी फुटून निसर्गाचे अनोखे रूप पर्यटकांना अनुभवयास मिळत आहे.

आधी पान गळती झाली आणि निसर्गात काहीसे नैराश्य निर्माण झाले आणि आता पुन्हा त्या झाडांना नवी पालवी येऊन नवचैतन्य निर्माण झाले असून याच रंगोत्सवात रंग खेळणारा निसर्ग माथेरान पर्यटनस्थळाच्या अवतीभवती दिसत आहे. येथील निसर्गात अद्भुत रंगांची उधळण लक्ष वेधून घेत आहे.

माथेरान हे निसर्गाने नटलेले पर्यटनस्थळ असून येथे सर्व ऋतूत नयनरम्य देखावे आणि निसर्गाची वेगवेगळी रूपे पहावयास मिळतात. वसंत पंचमीपासून वसंत ऋतूला सुरुवात होत असून या काळात निसर्ग मुक्तहस्ताने रंगाची उधळण करत असताना येथे दिसतो आहे. पळस फुलतो, काटेसावर बहरतो, मोगऱ्याची



फुले येथील निसर्गाच्या श्रृंगारात भर टाकतात आणि सुरू होतो तो निसर्गाचा रंगोत्सव. या रंगोत्सवात वसंत ऋतूत झाडाला येणारी नवीन पालवी हे पर्यटकांचे मोठे आकर्षण ठरत असते.पानगळती झालेल्या पाल्यापाचोळ्यातून चालताना कडक पाला तुटण्याचा होणारा आवाज यामुळे पर्यटक अगदी आनंदी होतात, तर करंज, आंबा, कोलारा या झाडांना आलेल्या नवीन पालवीवर सूर्यकिरणे पडल्यावर पालवी चमकताना दिसते हे तर पर्यटकांना अधिकच आकर्षित करीत आहे.

निर्सगाची किमया पाहण्यासाठी आम्ही परिवारासह आवर्जून माथेरानला येत असतो, असे येणाऱ्या पर्यटकांकडून बोलले जात आहे.

### पक्ष्यांचा किलबिलाटही वाढला

**वसंत ऋतू पक्ष्यांसाठीसुद्धा खूप महत्त्वाचा आहे. हा महिना पक्षांच्या मनोमिलनाचा असतो. त्यामुळे येथील निसर्गात सकाळपासून बुलबुल, कोळीला, साळुंकी, कूटरुक आणि स्वर्गीय नर्तक अशा पक्ष्यांचा किलबिलाट ऐकावयास मिळतो. यामुळे निसर्गप्रेमी पर्यटक या कालावधीत माथेरानला भेट देत असतात. पक्षी आवाज देऊन एकमेकांना संपर्क करीत असतात हे दृश्य अतिशय विलोभनीय असते.**

# राजस्थानचा चेन्नईवर थरारक विजय

## नितीश राणाची तडाखेबंद फलंदाजी



**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने घरच्या मैदानावरील अखेरच्या सामन्यात अखेरीस थरारक विजयाची नोंद केली. रियान परागच्या नेतृत्वाखालील राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा अवघ्या सहा धावांनी पराभव केला. राजस्थानने विजयासाठी सीएसकेला १८३ धावांचे लक्ष्य दिले, पण हा संघ निर्धारित २० षटकांत ६ विकेट गमावत १७६ धावा करूच शकला.

राजस्थानसाठी नितीश राणा आणि वानिंदू हसरंगा हे फलंदाज हिरो ठरले. याशिवाय दुसऱ्या डावात अखेरचे षटक टाकणाऱ्या संदीप शर्माने उत्कृष्ट गोलंदाजी केली. राजस्थान रॉयल्सचा सुरुवातीच्या तीन सामन्यांसाठी कर्णधार असलेल्या रियान परागला पहिला विजय नोंदवला आहे.

राजस्थानने दिलेल्या १८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात जोफ्रा आर्चरने रचिन रवींद्रला बाद करत चेन्नईला मोठा धक्का दिला. यानंतर ऋतुराज गायकवाड आणि राहुल त्रिपाठीने संथ सुरुवात करत काही फटके मारले, पण राजस्थाच्या संघाने विकेट्स घेत सामन्यात पुनरागमन करू दिले नाही.

अखेरच्या षटकात संदीप शर्माला १९ धावांचा बचाव करायचा होता. संदीपने पहिलाच चेंडू वाईड टाकला. धोनी स्ट्राईकवर होता, दुसऱ्या चेंडूवर धोनीने मोठा फटका खेळायला गेला आणि सीमारेषेजवळ झेलबाद झाला. चेन्नईच्या विजयाच्या आशांना इथे धक्का बसला. यानंतर दुसऱ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने १ धाव घेत जडेजाला स्ट्राईक दिली. तिसऱ्या चेंडूवर जडेजाने १ धाव घेतली. मग चौथ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने षटकार खेचला, पण पाचव्या चेंडूवर त्याने २ धाव घेतल्या आणि अखेरच्या चेंडूवर त्याला ९ धावा करायच्या होत्या, जे अशक्य होते. अशारितीने शेवटच्या चेंडूवर २ धावा घेत राजस्थानचा संघ विजयी ठरला.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने १८२ धावांची मजबूत धावसंख्या उभारली. यशस्वी जैस्वाल पहिल्याच षटकात बाद झाला, पण यावेळी राजस्थानने आपली चूक सुधारत तिसऱ्या क्रमांकाचा स्पेशालिस्ट नितीश राणाला पाठवले. याचा फायदा अखेर संघाला मिळाला आणि राणा येताच त्याने चेन्नईच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. राणाने अवघ्या ३६ चेंडूत ८१ धावांची स्फोटक खेळी खेळली.

# माथेरानमध्ये कुस्ती स्पर्धेचा थरार

## लोणंदच्या दिनेश कोकरेने मारली बाजी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये दरवर्षी ग्रामस्थ मंडळाकडून वसंत उत्सव साजरा केला जातो. या अंतर्गत गुढीपाडव्याच्या निमित्ताने श्रीराम मंदिर चौकातील मैदानावर कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. लोणंदचा मल्ल दिनेश कोकरे याने अंतिम व मानाची कुस्ती जिंकली.

या कुस्त्यांकरिता कर्जत खालापूर पनवेल, कल्याण, डोंबिवली, पुणे, सातारा, कोल्हापूर येथून कुस्ती खेळण्यासाठी पैलवान आले होते, तर सामने पाहण्यासाठी माथेरानमधील नागरिकांनी गर्दी केली होती.

कुस्ती स्पर्धेसाठी ग्रामस्थ मंडळाचा पुढाकार होता. यामध्ये अध्यक्ष प्रकाश सुतार यांच्यासह चंद्रकांत जाधव, शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, शिवाजी शिंदे, अनंता शेलार, प्रदीप घावरे, विठ्ठल पवार, व्यापारी मंडळ अध्यक्ष राजेश चौधरी तसेच सामाजिक कार्यकर्ते तथा अश्वापाल संघटनेचे किरण जाधव, शिवसैनिक



सागर पाटील यांचा या समावेश होता.

कुस्त्यांची सुरुवात लहान मुलांच्या सामन्यांपासून झाली. पहिल्यांदाच या कुस्ती स्पर्धेत मुलींनी सहभाग घेतला होता. शेवटची कुस्ती लोणंद आणि पुणे या भागातील पैलवानांमध्ये झाली. लोणंदचा मल्ल दिनेश कोकरे याने बाजी मारून उपस्थित मान्यवरांची आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

# दिल्लीचा हैदराबादवर दणदणीत विजय



**स्टार्कच्या पाच विकेट्स**

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सने रोमहर्षक सामन्यात वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादवर सात विकेट्सने मोठा शानदार विजय मिळवला. दिल्लीने सुरुवातीपासूनच सामन्यात आपला दबदबा कायम ठेवला आणि अखेरीस विजय मिळवून गतवर्षीच्या सामन्यातील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली.

अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. यासह दिल्ली कॅपिटल्सने यंदाच्या आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे. दिल्लीच्या संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट फिल्डिंग करत एकापेक्षा एक अनोखे झेल टिपले आणि या क्षेत्ररक्षणाच्या आणि पहिल्या डावातील कामगिरीच्या जोरावर दिल्लीने विजयाचा पाया रचला.

गतवर्षीच्या आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाने दिल्लीविरूद्ध २६६ धावांची सर्वात मोठी धावसंख्या उभारली होती आणि प्रत्युत्तरात दिल्ली संघाला १९९ धावांवर सर्वबाद केले होते. या सामन्यात ट्रॅव्हिस हेडने ८९ धावांची, तर अभिषेक शर्माने ४२ धावांची खेळी केली होती, पण दिल्लीने यंदा हैदराबादचा लाजिरवाणा पराभव करत बदला घेतला.

सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने चांगली सुरुवात केली. जेक फ्रेझर मॅकगर्क आणि फाफ डू प्लेसिस यांनी पहिल्या विकेटसाठी ८१ धावांची भागीदारी केली. प्लेसिसने २७ चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकारांसह ५० धावा केल्या, तर मॅकगर्कने ३२ चेंडूत चार चौकार आणि दोन षटाकारांसह ३८ धावांचे योगदान दिले. यानंतर आलेल्या केएल राहुलने शमीच्या षटकात वादळी फटकेबाजी करत ३००च्या स्ट्राईक रेटने ५ चेंडूत १५ धावा करत बाद झाला.

राहुलच्या विकेटनंतर ट्रिस्टन स्टब्स आणि अभिषेक पोरेलने संघाचा डाव सावरत विजय मिळवून देत नाबाद माघारी परतले. स्टब्सने १४ चेंडूत तीन चौकारांसह २१ धावा, तर अभिषेकल १८ चेंडूत दोन चौकार आणि दोन षटकार लगावत ३४ धावा केल्या.

# गुड मॉर्निंग संघ रामसिंग चषकाचा मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने प्रथम श्रेणी गटाच्या अंतिम सामन्यात अंकुर स्पोर्ट्सचा कडवा प्रतिकार ३०–२७ असा मोडून काढत रामसिंग चषक व रोख ११ हजार रुपये आपल्या नावे केले. गुड मॉर्निंगचा शार्दुल पाटील स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला एलईडी टीव्ही देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

विकास क्रीडा मंडळाने प्रभादेवी येथील राजाराम साळवी क्रीडांगणावर या स्पर्धेचे आयोजन



केले होते. आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात दोन लोण देत २२–११ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात सावध खेळ करीत आहे ती आघाडी टिकविण्यावर भर देत आपल्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. शार्दुल पाटील, साहिल राणे यांच्या झंझावाती चढाया त्यांना सर्वेश पांचाळची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला.

उत्तरार्धात अंकुरच्या सुशांत साईल, अभि भोसले, प्रयाग दळवी यांनी उत्तरार्धात आपला खेळ गतिमान करीत एका लोणची परत फेड केली. त्यामुळे सामन्याची रंगत वाढली, पण त्यांना अंकुरला विजेतेपद मिळवून देण्यात अपयश आले.

उपविजेत्या अंकुरला चषक व रोख नऊ हजार रुपयांवर समाधान मानावे लागले. अंकुरचा सुशांत साईल व गुड मॉर्निंगचा साहिल राणे हे स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचे खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी हूपर देऊन गौरविण्यात आले.

# मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची खबर; बुमराह तंदुरूस्त होतोय!

**बंगळुरू** : भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहला डिसेंबर २०२४मध्ये दुखापत झाली होती. या दुखापतीनंतर तो एनसीएमध्ये फिटनेस परत मिळवत आहे. दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये बुमराह पुन्हा गोलंदाजी करताना दिसत आहे. तो पूर्ण रनअपसह गोलंदाजी करताना दिसला आणि नंतर त्याने सेलिब्रेशनही केले. सध्या पहिल्या विजयाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या मुंबई इंडियन्ससाठी ही आनंदाची बातमी आहे. बॉर्डर–गावसकर मालिकेत जसप्रीत बुमराहला दुखापत झाली होती. सिडनीत खेळल्या गेलेल्या शेवटच्या कसोटीच्या दुसऱ्या डावात तो गोलंदाजीला उतरू शकला नाही. बुमराह दुखापतीमुळे इंग्लंड मालिका आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमधूनही बाहेर झाला होता.

# महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही पत्रकार मित्र असोसिएशन, आपला आधार फाउंडेशन, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टतर्फे १७ एप्रिल रोजी महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना स्कुटी, सोन्याची नथ, कुलर, चांदीचे नाणे, इस्त्री, पैठणी यासह विविध आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. विजेत्यांबरोबरच सहभागी प्रत्येक महिलेला भेटवस्तू दिली जाईल.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १० एप्रिलपर्यंत नावनोंदणीची मुदत आहे. इच्छूकांनी नावनोंदणीसाठी आयोजक केवल महाडीक (९३२०६४६५५५, ९३२११५८०९०) यांच्याशी संपर्क साधावा. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असून अटी व शर्ती लागू आहेत.



**पनवेल : स्व. दुनकुरी बाळू म्हात्रे यांच्या स्मरणार्थ खांदा कॉलनी येथे मस्ती ग्रुपच्या वतीने खांदा कॉलनी प्रीमियर लीग आयोजित करण्यात आली होती. या क्रिकेट स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, ओबीसी सेलचे रामनाथ पाटील आदी उपस्थित होते.**



**मुरुड : गुढीपाडव्यानिमित्ताने येथील समुद्रकिनारी बैलगाडी व घोडागाडीच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती.** (छाया : सुधीर नाझरे)















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com